# बहुवार्षिक दरपत्रक (एमवायटी) – मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिका

आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. – वितरण

कार्यकारी सारांश



# अनुक्रमणिका


१ परिचय ....५

१.१ आरइन्फ्रा वितरणविषयी ....५

१.२ मध्यावधी पुनरावलोकन याचिकेचा उद्देश ....५

२ आ.व. २०१५–१६साठी पुरवठ्याच्या सरासरी खर्चाचे विश्लेषण ....५

३ माननीय एटीईच्या निकालांचा परिणाम ....८

३.१ आ.व. २००९–१०, आ.व. २०१०–११ आणि आ.व. २०११–१२ साठी आयकर ....८

३.२ आ.व. २०११–१२ साठी दीर्घकालीन भांडवलावरील व्याज ....९

३.३ आ.व. २००८–०९ मध्ये विलंबित प्रदानांवरील व्याज ....९

३.४ कॅरिंग कॉस्टचा परिणाम ....९

४ आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४चे ट्रूइंग अप, आ.व. २०१४–१५ चे वार्षिक कामगिरी पुनरावलोकन (एपीआर) आणि आ.व. २०१५–१६साठी एआरआर ....१०

४.१ विक्री ....१०

४.२ वितरणातील तोटा आणि ऊर्जा शिल्लक ....१२

४.३ विजेची खरेदी ....१३

४.४ एफएसीवर व्याज ....१६

४.५ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च ....१६

४.६ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण ....१८

४.७ घसारा ....१९

४.८ कर्जावरील व्याज ....१९

४.९ इक्विटीवरील परतावा ....२०

४.१० खेळत्या भांडवलावरील व्याज आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज ....२१

४.११ बुडीत आणि संशयास्पद कर्जांसाठी तरतूद ....२१

४.१२ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी ....२१

४.१३ आयकर ....२१

४.१४ वीजदराव्यतिरिक्तचे उत्पन्न ....२२

४.१५ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न ....२३

४.१६ आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठी कार्यक्षमता लाभ/तोटा ....२३

४.१६.१ वितरण तोट्यातील विचलन ....२३

४.१६.२ प्रचालन आणि देखभाल खर्चाचे (ओ अँड एम) विचलन ....२४

४.१७ वायर्स आणि पुरवठा उपलब्धतेमुळे अतिरिक्त परतावा ....२४

४.१८ टीपीसी–जीला प्रदान ....२५

४.१९ एकूण महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश ....२५

४.२० विजेच्या विक्रीपासूनचा महसूल......३३
४.२१ चेंजओव्हर आणि ओपन अॅक्सेस (ओए) ग्राहकांकडूनच्या व्हिलिंग चार्जेसपासून महसूल......३४
४.२२ क्रॉस सबसिडी सरचार्जेसपासूनचा (सीएसएस) महसूल......३५
४.२३ आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ पर्यंतची महसुलातील तफावत......३६
४.२४ वायर्स व्यवसाय आणि रिटेल व्यवसाय यांचे स्वतंत्र ट्रूईंग अप......३७
५ कॅरिंग कॉस्टसहित महसुलातील एकत्रित तफावत आणि दरपत्रकाचा प्रस्ताव......३८
५.१ महसुलातील एकत्रित तफावत......३८
५.२ आ.व. २०१५–१६साठी दरपत्रकाचा प्रस्ताव......३८
५.२.१ व्हिलिंग चार्जेस......३९
५.२.२ क्रॉस सबसिडी सरचार्जेस (सीएसएस) ......४०
५.२.३ किरकोळ दरपत्रक......४२
५.२.४ नियामक मालमत्ता वसुली आणि आकार......४९

# तक्त्यांची सूची


तक्ता१: आ.व. २०१४–१५ आणि आ.व. १५–१६ यांच्यामधील पुरवठ्याच्या सरासरी खर्चातील बदल (फक्त स्टँड–अलोन खर्च)........ ६

तक्ता २: आ.व. २०१५–१६च्या एआरआरवर महसुलातील मागील तफावतीचा परिणाम........ ७

तक्ता ३: एकूण एआरआर (महसुलातील मागील तफावतीसह) ........ ७

तक्ता ४: आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीचा आणि चेंजओव्हर विक्रीचा (मेयू) सारांश........११

तक्ता ५: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंतची शिल्लक ऊर्जा........१२

तक्ता ६: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंतची वीज खरेदी........१५

तक्ता ७: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंत वीज खरेदी किंमत........१५

तक्ता ८: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६मधील प्रचालन आणि देखभाल खच........१८

तक्ता ९: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीचे भांडवली खर्च........१८

तक्ता १०: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंत भांडवलीकरण........१९

तक्ता ११: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीतील घसारा........१९

तक्ता १२: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठी कर्जावरील व्याज........ २०

तक्ता १३: आ.व. २०१२–१३ ते २०१५–१६ या कालावधीसाठी इक्विटीवरील परतावा........२०

तक्ता १४: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठी आयकर........२२

तक्ता १५: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीचे वीजदराव्यतिरिक्तचे उत्पन्न........ २२

तक्ता १६: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीतील इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न........२३

तक्ता १७: आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठीची आरइन्फ्रा–डीने प्राप्त केलेली वायर्स उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धता........ २४

तक्ता १८: वायर्स उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धता अधिक प्रमाणात प्राप्त केल्याबद्दल अतिरिक्त परतावा........ २५

तक्ता १९: वायर्स व्यवसायासाठीची आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठीची एकत्रित महसुलाची आवश्यकता........२६

तक्ता २०: रिटेल व्यवसायासाठी आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६साठी एकूण महसुलाची आवश्यकता........ २७

तक्ता २१: रिटेल व्यवसायासाठी आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६साठी एकूण महसुलाची आवश्यकता........ २८

तक्ता २२: आ.व. २०१२–१३साठी वास्तविक एआरआर आणि मान्यता दिलेली एआरआर यांची तुलना........ २९

तक्ता २३: आ.व. २०१३–१४च्या वास्तविक एआरआर आणि मान्यता दिलेल्या एआरआरमधील तुलना........ ३०

तक्ता २४: आ.व. २०१४–१५साठीच्या वास्तविक एआरआरमधील आणि मान्यता दिलेल्या एआरआरमधील तुलना........३१

तक्ता २५: आ.व. २०१५–१६ साठी वास्तविक एआरआर आणि मान्यता दिलेल्या एआरआरमधील तुलना........३२

तक्ता २६: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५पर्यंतचा महसूल........३३

तक्ता २७: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ या कालावधीतील व्हिलिंग चार्जेसपासूनचा महसूल........ ३४

तक्ता २८: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ या कालावधीसाठी सीएसएसपासूनचा महसूल........३५

तक्ता २९: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ पर्यंतची स्टँडअलोन महसुलातील तफावत........३६

तक्ता ३०: वायर्स व्यवसायाची आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५पर्यंतची महसुलातील तफावत........ ३७

तक्ता ३१: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५साठी रिटेल व्यवसायासाठीची स्टँड अलोन महसुलातील तफावत........................ ३७
तक्ता ३२: महसुलातील एकत्रित तफावत........................................................................................................३८
तक्ता ३३: आ.व. २०१५–१६मध्ये वसूल करण्याजोगी वायर्स एआरआर.........................................................................३९
तक्ता ३४: व्हिलिंग चार्जेस............................................................................................................ ३९
तक्ता ३५: आ.व. २०१५–१६मधील व्हिलिंग चार्जेसपासूनचा महसूल.........................................................................४०
तक्ता ३६: सीएसएस सूत्रात वापरलेले घटक.........................................................................................................४०
तक्ता ३७: आ.व. २०१५–१६साठी क्रॉस सबसिडी अधिभार.........................................................................................४१
तक्ता ३८: आ.व. २०१५–१६साठी सीएसएसपासूनचा महसूल......................................................................................४२
तक्ता ३९: आ.व. २०१५–१६साठी पुरवठ्याचा सरासरी खर्च.........................................................................................४३
तक्ता ४०: सध्याचे दरपत्रक (आ.व. २०१४–१५साठी मान्यता दिलेले) ...........................................................................४५
तक्ता ४१: आ.व. २०१५–१६साठी प्रस्तावित किरकोळ दरपत्रक....................................................................................४७
तक्ता ४२: आ.व. २०१५–१६साठी मान्यता देण्यात आलेले नियामक मालमत्ता आकार..................................................................४९
तक्ता ४३: आ.व. २०१३–१४पासून आ.व. २०१५–१६पर्यंत नियामक मालमत्ता वसुली..................................................................५०
तक्ता ४४: प्रचलित बदलता आकार आणि सुधारित बदलता आकार यांची तुलना................................................................ ५१
तक्ता ४५: प्रस्तावित दरांनुसार सरासरी बिलिंग दर आणि सध्याच्या दरपत्रकांमधील वाढीची टक्केवारी..............................................५२
तक्ता ४६: आ.व. २०१५–१६मधील क्रॉस सबसिडीची पातळी.......................................................................................५४

# १ परिचय

## १.१ आरइन्फ्रा वितरणविषयी

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (यानंतर आरइन्फ्रा), ह्या विद्युत वितरण परवानाधारक कंपनीला माननीय मविनिआ आयोगाने मुंबईच्या उपनगरांमध्ये आणि मीरा भायंदर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील क्षेत्रात २५ वर्षांच्या कालावधीसाठी विद्युत पुरवठा करण्यासाठी १६ ऑगस्ट २०११ पासून परवाना दिलेला आहे. यापूर्वी, आरइन्फ्राला विद्युत कायदा, २००३मधील तरतुदींनुसार मुंबईच्या उपनगरांमध्ये परवानाधारक म्हणून समजले जात होते. आरइन्फ्राच्या वितरण व्यवसायाचा उल्लेख यापुढे आरइन्फ्रा-डी असा केलेला आहे.

## १.२ मध्यावधी पुनरावलोकन याचिकेचा उद्देश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दरपत्रक) नियमावली, २०११ मधील विनियम ११मध्ये असे नमूद केलेले आहे की, बहुवार्षिक दरपत्रक अंतर्गत येणाऱ्या वितरण परवानाधारकाला नियंत्रण कालावधीमध्ये मध्यावधी कामगिरी पुनरावलोकन सादर करावे लागते. तसेच, माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१३ रोजी (२०१३चे प्रकरण क्र.९) दिलेल्या एमवायटी आदेशात आरइन्फ्रा–डीला मध्यावधी पुनरावलोकनासाठी त्यांची याचिका कामगिरीतील विचलनाच्या कारणांसह ३० नोव्हेंबर २०१४पर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले होते. बहुवार्षिक नियमावलीच्या वरील तरतुदीनुसार आणि माननीय आयोगाने दिलेल्या उपरोल्लिखित निर्देशानुसार आरइन्फ्रा–डी ही सध्याची मध्यावधी पुनरावलोकन याचिका दाखल केलेली आहे. मागील कालावधीसाठीची म्हणजेच आ.व. १२–१३ आणि आ.व. १३–१४ साठीची वास्तविक आकडेवारी आणि नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीसाठीचे, म्हणजेच आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६ सुधारित अंदाज मान्यतेसाठी माननीय आयोगाकडे सादर करण्यात येत आहे. आरइन्फ्रा–डी, एटीईने दिलेल्या विविध निकालांचा परिणामही सादर करीत आहे आणि मागील काळात माननीय आयोगाने नाकारलेल्या विशिष्ट खर्चांच्या रकमांना पुन्हा अनुमती मागत आहे. या सर्व खर्चांच्या वसुलीसाठी आरइन्फ्रा–डीने स्वत:च्या ग्राहकांसाठी सुधारित किरकोळ दरपत्रकात, स्वत:च्या तसेच बदलून गेलेल्या ग्राहकांसाठीच्या व्हिलिंग चार्जेसमध्ये आणि गेलेल्या ग्राहकांसाठी क्रॉस सबसिडी सरचार्जेसमध्ये सुधारणा प्रस्तावित केलेली आहे.

# २ आ.व. २०१५–१६साठी पुरवठ्याच्या सरासरी खर्चाचे विश्लेषण

या याचिकेत दिलेल्या आरइन्फ्रा-डीच्या दरपत्रकाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यासाठी, आ.व. २०१५-१६ साठीच्या पुरवठ्याच्या सरासरी खर्चाची वर्गवारी करून त्यांचे वेगवेगळे घटक तसेच आ.व. २०१४-१५ मधील प्रचलित खर्च यांचे विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे. हे विश्लेषण आणि त्यातून निघणारा अर्थ पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता १: आ.व. २०१४–१५ आणि आ.व. १५–१६ यांच्यामधील पुरवठ्याच्या सरासरी खर्चातील बदल (फक्त स्टँड–अलोन खर्च)**

| तपशील | आ.व. १४–१५ | | आ.व. १५–१६ | | बदल | %बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. कोटी | रु./किवॅतास | रु. कोटी | रु./किवॅतास | (रु./किवॅतास) | |
| पीपी खर्च (डीटीपीएसची मागील तफावत वगळून) | ५, १२४. ३७ | ६. ७३ | ४, ७३७. १० | ५. ९१ | (०.८२) | |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | १, ०२३. २९ | १. ३४ | १, ११२. २९ | १. ३९ | ०. ०४ | |
| घसारा | २०२. ६४ | ०. २७ | २१३. ३४ | ०. २७ | ०. ०० | |
| कर्जावरील व्याज | १२३. ६१ | ०. १६ | १३५. ६० | ०. १७ | ०. ०१ | |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १०३. ७६ | ०. १४ | १२५. ७२ | ०. १६ | ०. ०२ | |
| बुडीत कर्जासाठी तरतूद | १३. ९६ | ०. ०२ | १३. ९६ | ०. ०२ | (०. ००) | |
| आयकर | – | – | – | – | – | |
| भांडवल राखीव निधीसाठी वर्गणी | ११. ४८ | ०. ०२ | १२. २६ | ०. ०२ | ०. ०० | |
| इक्विटीवरील परतावा | २७१. ७२ | ०. ३६ | २८९. २२ | ०. ३६ | ०. ०० | |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १८८. २१ | ०. २५ | १९८. ६९ | ०. २५ | ०. ०० | |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. ४४ | ०. ०० | ०. ४४ | ०. ०० | (०. ००) | |
| एफएसीवर व्याज | ३. १४ | ०. ०० | – | – | (०. ००) | |
| **एकूण–चालू** | ६, ६८९. ३१ | ८. ७८ | ६, ४४०. ३६ | ८. ०४ | (०. ७५) | –८. ५०% |
| वजा: बदललेल्या ग्राहकांकडून व्हिलिंगपासून मिळालेला महसूल | (२६५. ४१) | (०. ३५) | (५१३. ०९) | (०. ६४) | (०. २९) | |
| वजा: सीएसएपासून महसूल | (२२२. ०४) | (०. २९) | (२६९. ५०) | (०. ३४) | (०. ०४) | |
| **निव्वळ चालू एआरआर** | ६, २०१. ८६ | ८. १४ | ५, ६५७. ७७ | ७. ०६ | (१. ०८) | |
| विक्री (मेयू) | ७, ६१६. ३९ | | ८, ०१४. १६ | | | |

**तक्ता २: आ.व. २०१५–१६च्या एआरआरवर मागील महसुलातील तफावतीचा परिणाम**

| तपशील | आ.व. १४–१५ | | आ.व. १५–१६ | | बदल |
|---|---|---|---|---|---|
| | रु. कोटी | रु./किवॅतास | रु. कोटी | रु./किवॅतास | |
| **एटीई निकालामुळे परिणाम** | | | | | |
| आयकराच्या रकमेवर एटीई निकालाचा परिणाम | ---* | --- | ११७. ५२ | ०. १५ | ०. १५ |
| दीर्घकालीन कर्जांच्या व्याजाच्या रकमेवर एटीई निकालाचा परिणाम | --- | --- | २९. ४७ | ०. ०४ | ०. ०४ |
| एटीई निकालामुळे आणि इतर नियंत्रणयोग्य नसलेल्या कारणांमुळे मागील तफावत (डीटीपीएसच्या मागील तफावतीसह) | -- | -- | १, ७३६. ८० | २. १७ | २. १७ |
| **मागील घटनांचा आणि एटीई निकालाचा एकूण परिणाम** | | | १, ८८३. ८० | २. ३५ | २. ३५ |
| विक्री (मेयू) | | | ८, ०१४. १६ | | |

**आ.व. २०१४–१५ मधील आयकराच्या रकमेवरील आणि व्याजाच्या खर्चावरील एटीई निकालाचा परिणाम हा १९९०.६३ कोटी रुपये हा मागील महसुलाचा हिस्सा आहे आणि म्हणून तो स्वतंत्रपणे दर्शविलेला नाही.*

**तक्ता३: एकूण एआरआर (महसुलातील मागील तफावतीसह)**

| तपशील | आ.व. १४–१५ | | आ.व. १५–१६ | | बदल |
|---|---|---|---|---|---|
| | रु. कोटी | रु./किवॅतास | रु. कोटी | रु./किवॅतास | |
| एकूण एआरआर (स्टँड–अलोन) – प्रस्तावित व्हिलिंग आणि सीएसए वजा करण्यापूर्वी | ६, ६८९. ३१ | ८. ७८ | ६, ४४०. ३५ | ८. ०४ | (०. ७५) |
| मागील घटनांचा आणि एटीई निकालाचा एकूण परिणाम | -- | -- | १, ८८३. ८० | २. ३५ | २. ३५ |
| एकूण वसूल करण्याजोगी एआरआर (व्हिलिंग चार्जेस, सीएसएस आणि किरकोळ दरपत्रक यांच्यापासून) | ६, ६८९. ३१ | ८. ७८ | ८, ३२४. १६ | १०. ३९ | १. ६० |
| **विक्री (मेयू)** | ७६१६. ३९ | | ८, ०१४. १६ | | |

**संदर्भ: तक्ता १:** असे दर्शवितो की, आ.व. २०१५–१६साठी वर्तविलेले खर्च हे आ.व. २०१४–१५च्या प्रचलित पातळीच्या तुलनेत खरे म्हणजे कमी होत आहेत. ही घट संपूर्णपणे तसेच रु. प्रति युनिट अशी दोन्ही प्रकारे झालेली आहे. आ.व. २०१४–१५ आणि २०१५–१६च्या दरम्यान पुरवठ्याच्या सरासरी खर्चात ८% पेक्षा अधिक निव्वळ घट झालेली आहे.

**संदर्भ: तक्ता** २: आ.व. २०१४–१५सहित अगोदरच्या वर्षांतील महसुलातील तफावतीवर माननीय एटीईच्या निकालांचा (आयकराच्या रकमेवर आणि दीर्घकालीन भांडवली कर्जाच्या रकमेवर मान्यता) मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला आहे. तसेच, आ.व. २०१३–१४मध्ये (एमवायटी आदेशात गृहीत धरल्यानुसार एप्रिल २०१३ ऐवजी सप्टेंबर २०१३) विक्रीच्या प्रमाणाचा जास्तीचा अंदाज बांधल्याने आणि व्हिलिंग चार्जेस आणि सीएसएस उशिरा लागू केल्याने व्हिलिंग चार्जेस आणि सीएसएस यांचापासून मिळणारा महसूल अगोदरच्या वर्षात कमी झाल्याने हे घटक अगोदरच्या वर्षातील महसुलातील तफावत वाढण्यास मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले आहेत. महसुलाच्या ह्या तफावती संपूर्णपणे आ.व. २०१५–१६मध्ये वसूल करून पुरवठ्याच्या सरासरी खर्चात जोडण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

**संदर्भ: तक्ता** ३: स्टँड–अलोन बेसिसवर आ.व. २०१५–१६साठीचा एआरआर सध्या प्रचलित असलेल्या दरांनुसार जवळजवळ सर्व वसूल करता आला असता आणि स्टँड अलोन बेसिसवर दरपत्रकात वास्तविक कोणतीही वाढ करायची आवश्यकता नसती. दरपत्रकातील वाढ ही म्हणूनच फक्त मागील अमान्य केलेले खर्च वसूल करण्यासाठी आवश्यक आहे, ज्यांना आता माननीय एटीईच्या निकालानुसार मान्यता देण्यात आलेली आहे आणि नियंत्रणयोग्य नसलेल्या ज्या घटकांमुळे आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ या कालावधीत खर्चात वाढ झाली व महसुलात घट झाली. वस्तुत:, आ.व. २०१५–१६च्या प्रस्तावित स्टँड अलोन खर्चातील अपेक्षित घट खरे म्हणजे पूर्वीच्या खर्चांचा परिणाम काही अंशी भरून काढते आणि आवश्यक असलेल्या दरपत्रकातील वाढीची तीव्रता कमी करते, हे त्या संदर्भित तक्त्यावरून दिसून येते.

या पार्श्वभूमीवर, अगोदरच्या वर्षाच्या तफावतीतील वेगवेगळ्या घटकांचा सारांश आणि येणाऱ्या वर्षासाठीचे अंदाज यांची चर्चा या पुढील विभागात केलेली आहे:

# ३ माननीय एटीईच्या निकालांचा परिणाम

## ३.१ आ.व. २००९–१०, आ.व. २०१०–११ आणि आ.व. २०११–१२ साठीचा आयकर

माननीय आयोगाने त्यांच्या अगोदरच्या आदेशात, महसूल आणि खर्च यांच्या विभागवार वाटणीवर आधारित आणि आरइन्फ्राने वेगवेगळ्या विभागांनुसार भरलेला एकूण कर, अशा प्रकारे विभागवार वाटणीच्या आधारे काढलेल्या करयोग्य उत्पन्नावर, आ.व. २००९–१०, आ.व. २०१०–११ आणि आ.व. २०११–१२ साठी आरइन्फ्रा–डीसाठी आयकराला मान्यता दिलेली होती. आरइन्फ्रा–डीने माननीय एटीईकडे या आदेशांविरुद्ध अपील दाखल केलेले आहे आणि त्याचा निकाल प्रलंबित आहे. तथापि, आरइन्फ्रा–जी आणि आरइन्फ्रा–टी यांनी माननीय एटीईकडे याच विषयावर अपील दाखल केली होती (२०१२ चे अपील क्र. १३८ आणि १३९), ज्यांचा निकाल माननीय एटीईने दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी दिलेला आहे. या निकालात असे म्हटलेले आहे की, प्रत्येक स्टँड अलोन रेग्युलेटेड व्यवसायाचा महसूल आणि मान्य करण्याजोगे खर्च विचारात घेऊन करपूर्व नफा लक्षात घेऊन आयकराला मान्यता द्यायला हवी. त्यानुसार, आरइन्फ्रा–डीने स्टँड अलोन आधारावर गणना केलेला आयकर आणि माननीय आयोगाने अगोदरच्या आदेशांमध्ये आ.व. २००९–१०, आ.व. २०१०–११ आणि आ.व. २०११–१२ साठी मान्यता दिलेला

आयकर हा आ.व. १५–१६च्या एआरआरसोबत अतिरिक्त मान्यता देण्यायोग्य आयकर म्हणून दावा केलेला आहे. आ.व. २००९–१० ते आ.व. २०११–१२साठीच्या फरकामुळे आलेली आयकराची रक्कम रु. १०० कोटी एवढी आहे.

## ३.२ आ.व. २०११–१२साठी दीर्घकालीन भांडवलावरील व्याज

माननीय आयोगाने आ.व. २०११–१२साठीच्या एआरआरला आरइन्फ्रा–डीसाठी मान्यता देताना, आ.व. २०११–१२मध्ये घेतलेल्या नवीन कर्जांसाठी बाजारात प्रतिबिंबित होणारा ११.५०% एवढ्या दराला मान्यता दिली होती. तथापि, माननीय आयोगाने दिनांक १ एप्रिल २०११ रोजीनुसार असलेल्या आरंभीच्या शिल्लक कर्जाचे रिसेटिंग करण्यास, बाजारात प्रतिबिंबित होणाऱ्या १ एप्रिल २०११ रोजीनुसारच्या कर्जांसाठी विचारात घेण्याची परवानगी दिली नाही. आरइन्फ्रा–डीने ही बाब त्यांनी एटीईकडे केलेल्या अपीलात उपस्थित केली होती आणि त्यावरील निर्णय प्रलंबित आहे. तथापि, कर्जावरील प्रचलित खर्च विचारात घेऊन अस्तित्वातील नमुनेदार कर्जावरील व्याजाच्या खर्चाला परवानगी न देण्याची अशाच प्रकारची बाब आरइन्फ्रा–जी आणि आरइन्फ्रा–टी यांनी उपस्थित केली होती (२०१२ च्या अपील क्र. १३८ आणि १३९मध्ये), ज्यावर माननीय एटीईने २ डिसेंबर २०१३ रोजी निकाल दिलेला आहे. या निकालात असे म्हटलेले आहे की, नमुनेदार कर्जावर मान्यता देण्याजोगे व्याज हे बाजारात उपलब्ध असलेल्या कर्जावरील व्याजाप्रमाणे असले पाहिजे. त्यानुसार आरइन्फ्रा–डीने आ.व. ११–१२मध्ये आरइन्फ्रा–डीसाठी मान्य होण्याजोगे व्याजावरील खर्चाची पुनर्गणणा त्यांच्या कर्जाच्या नमुनेदार हिश्श्यावरील व्याजदर हे आरइन्फ्राच्या वितरण व्यवसायाशी संबंधित वास्तविक कर्जावरील वेटेड सरासरी व्याजदराएवढी केलेली आहे. आ.व. २०११–१२साठीच्या व्याजावरील फरकाच्या खर्चाची रक्कम २७.९९कोटी रुपये एवढी आहे.

## ३.३ आ.व. २००८–०९ मध्ये विलंबित प्रदानांवरील व्याज

माननीय आयोगाने आ.व. २००८–०९साठी आरइन्फ्रा–डीच्या हिशेबांचे ट्रूईंग अप करताना, (२०१० चे प्रकरण क्र.७२) आ.व. २००८–०९च्या दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नाच्या विलंबित प्रदानावरील व्याज दोनदा हिशेबात घेतले होते. आरइन्फ्रा–डीने माननीय एटीएसमोर हा मुद्दा उपस्थित केलेला होता व त्यासंबंधीचा निकाल १४ नोव्हेंबर २०१३ रोजी देण्यात आला आणि माननीय एटीईने ह्या मुद्यावरील निकाल आरइन्फ्रा–डीच्या बाजूने दिला. विलंबित प्रदानावरील दोनदा हिशेबात घेतलेली रक्कम ६.६८ कोटी रुपये एवढी होती.

## ३.४ कॅरिंग कॉस्टचा परिणाम

आरइन्फ्रा–डीने एटीईच्या या निकालांच्या परिणामांची गणना कॅरिंग कॉस्टसहित, एटीईने दिनांक १३ सप्टेंबर २०१२ रोजी दिलेल्या निकालानुसार (२०१०चे प्रकरण क्र. २०२ आणि २०३) केलेली आहे. विलंबित प्रदानावरील व्याजाच्या बाबतीत आरइन्फ्रा–डीने परिणामाची गणना, कॅरिंग कॉस्टसहित आ.व. २०१३–१४पर्यंत केलेली आहे, ज्याची रक्कम १२.६७ कोटी रुपये एवढी होते. आ.व. २०११–१२ पर्यंतच्या आयकराच्या बाबतीत आणि आ.व. २०११–१२साठी व्याजाच्या बाबतीत आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१५–१६पर्यंतच्या परिणामांची कॅरिंग

कॉस्टसहित गणना केलेली आहे, ज्याची रक्कम २८२.७७ कोटी रुपये होते. म्हणून, एटीई निकालांचा कॅरिंग कॉस्टसहितचा एकूण परिणाम २९५.४४ कोटी रुपये एवढा आहे.

## ४ आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४चे ट्रूईंग अप, आ.व. २०१४–१५ चे वार्षिक कामगिरी पुनरावलोकन (एपीआर) आणि आ.व. २०१५–१६साठी एआरआर.

### ४.१ विक्री

माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या एमवायटी आदेशात, आ.व. २०१३–१४ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठी स्वत:च्या विक्रीला, आरइन्फ्रा–डीने एमवायटी याचिकेत दिलेल्या अंदाजांच्या आधारे मान्यता दिलेली आहे. आ.व. २०१२–१३च्या चेंजओव्हर विक्रीच्या बाबतीत, माननीय आयोगाने टीपीसी–डीच्या दिनांक २८ जून २०१३ रोजी दिलेलेया एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या विक्रीला मान्यता दिलेली आहे (२०११चे प्रकरण क्र. १७९). आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या ग्राहकांना केलेली आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४मधील विक्री खालील तक्त्यात सादर केलेली आहे. आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६साठी आरइन्फ्रा–डीने विक्रीचा अंदाज हे, दरमहा ३०० युनिटपर्यंत वापर करणाऱ्या निवासी ग्राहकांचा चेंजओव्हर, दरपत्रकातील फरकाचा लाभ घेण्यासाठी चेंजओव्हर ग्राहकांचे आरइन्फ्रा–डीच्या इतर संवर्गामध्ये स्थलांतरित होणे आणि माननीय आयोगाच्या विरोधात (२०११चे प्रकरण क्र. १५१, २०१३चे प्रकरण क्र. ८५ आणि २०१३चे प्रकरण क्र. ३) माननीय एटीईने दिलेला निकाल, यांसारख्या सर्व घटकांचा विचार करून लावला होता. आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीतील आणि आ.व. २०१५–१६मधील विक्रीचा अंदाज वर्तविण्यासाठी विचारात घेतलेले टप्पे पुढे थोडक्यात दिले आहेत.

टप्पा १: आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीतील वास्तविक विक्रीचा विचार करणे.

टप्पा २: ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ आणि एप्रिल २०१५पासून मार्च २०१६पर्यंतच्या एकूण विक्रीचा अंदाज, सप्टेंबर महिन्याच्या बाबतीतल्या परस्पर घटकांचा (कोरिलेशन फॅक्टर) वेगवेगळ्या महिन्यांच्या बाबतीत विचार करून आणि विशिष्ट खपातील वाढ हिशेबात धरण्यासाठी मागील काळातील वृद्धीचे घटक विचारात घेऊन नवीन ग्राहक जोडून आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीतील (स्वत:ची विक्री तसेच चेंजओव्हर विक्री) आणि आ.व. २०१५–१६मधील विक्रीचा अंदाज वर्तविणे.

टप्पा ३: सप्टेंबर महिन्याच्या बाबतीतल्या परस्पर घटकांचा (कोरिलेशन फॅक्टर) वेगवेगळ्या महिन्यांच्या बाबतीत विचार करून आणि या चेंजओव्हर ग्राहकांच्या विशिष्ट खपातील वाढ हिशेबात धरण्यासाठी नाममात्र वृद्धीचे घटक विचारात घेऊन आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीतील आणि आ.व. २०१५–१६मधील बेस चेंजओव्हर विक्रीचा अंदाज वर्तविणे.

टप्पा ४: एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४चा परतीच्या स्थलांतराचा कल विचारात घेऊन आरइन्फ्रा–डीच्या पुरवठ्याकडे परत येणाऱ्या चेंजओव्हर ग्राहकांचे विक्रीचे (संवर्गनिहाय मासिक विक्री) अंदाज वर्तविणे.

टप्पा ५: ०–३०० युनिटस ग्राहकांचा एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४पर्यंतचा स्थलांतराचा कल लक्षात घेऊन ०–३०० युनिटस ग्राहकांना होणाऱ्या विक्रीतील (संवर्गनिहाय मासिक विक्री) वाढती घट वर्तविणे.

टप्पा ६: आरइन्फ्रा–डीकडे परत वळणाऱ्या ग्राहकांना केलेली विक्री वजा करून आणि ०–३०० युनिटस पर्यंतच्या स्थलांतरित होणाऱ्या ग्राहकांना केलेली विक्री वरील टप्पा ३ मध्ये काढलेल्या चेंजओव्हर विक्रीत जोडून, आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीतील आणि आ.व. २०१५–१६मधील अपेक्षित चेंजओव्हर विक्रीची गणना करणे.

टप्पा ७: वरील टप्पा ६मध्ये काढलेली अपेक्षित चेंजओव्हर विक्री वरील टप्पा २मध्ये काढलेल्या अपेक्षित विक्रीतून वजा करणे व अशा प्रकारे आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीतील आणि आ.व. २०१५–१६मधील स्वत:च्या अपेक्षित विक्रीची गणना करणे.

आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४मधील वास्तविक विक्री, आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६मधील अंदाज वर्तविण्यात आलेली विक्री खाली दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता ४: आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीचा आणि चेंजओव्हर विक्रीचा (मेयू) सारांश**

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| आरइन्फ्रा–डीची स्वत:ची विक्री | ६, २०७. १८ | ६, ४६७. ९६ | ७, ६१६. ३९ | ८, ०१४. १६ |
| चेंजओव्हर विक्री | ३, ११४. ३७ | २, ८४३. ३७ | १, ९६२. ९५ | १, ८८१. ७७ |
| एकूण विक्री | ९, ३२१. ५५ | ९, ३११. ३३ | ९, ५७९. ३४ | ९, ८९५. ९३ |

आरइन्फ्रा–डीचे म्हणणे असे आहे की, आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४ची वास्तविक विक्री, आव. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६च्या अंदाजित विक्री, माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१३ रोजी दिलेल्या एमवायटी निकालापेक्षा (२०१३चे प्रकरण क्र. ९) बरीच कमी आहे. अशा प्रकारच्या बदलासंबंधीचे स्पष्टीकरण तपशीलवारपणे याचिकेत दिलेले आहे. एमवायटी आदेशात विक्रीचे जास्तीचे अंदाज वर्तविल्यामुळे महसुलावर परिणाम झालेला आहे.

## ४.२ वितरणातील तोटा आणि ऊर्जा शिल्लक

आ.व. २०१२–१३साठीचा वितरणातील वास्तविक तोटा ९.४९% होता, तर तोच आ.व. २०१३–१४साठी ९.५०% होता. आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१४–१५साठी आणि आ.व. २०१५–१६साठी शिल्लक ऊर्जेचा अंदाज, अनुक्रमे ९.४१% आणि ९.३६% वितरणातील तोटा विचारात घेऊन वर्तविलेला आहे, ज्याला माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) मान्यता दिलेली होती. ट्रुईंग अपसाठी आरइन्फ्रा–डीने त्यांना विद्युतनिर्मिती कंपन्यांनी दिलेले ऊर्जेचे वास्तविक बिल आणि त्यातील वाढ/घट एफबीएसएम कच्च्या बिलांनुसार विचारात घेतलेली आहे. याचे कारण असे आहे की, स्टेट इंबॅलन्स पूलकडून प्राप्त महसूल किंवा या पूलला दिलेला महसूल हा स्टेट इंबॅलन्स पूलच्या ऊर्जेतील वाढीनुसार/घटीनुसार असतो. म्हणून आ.व. २०१२–१३, आ.व. २०१३–१४ साठी आणि आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीसाठीचा पारेषणातील तोटा हा माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) मान्यता दिलेल्या तोट्यापेक्षा वेगळा गणलेला दिसून येतो. जेव्हा एफबीएसएमच्या विवरणांना एमएसएलडीसीकडून अंतिम रूप दिले जाईल, तेव्हा आरइन्फ्रा–डीला सर्व स्रोतनिहाय बिल केलेली ऊर्जा आणि एफबीएसम विवरणानुसारची ऊर्जा यांचे समामेलन केले जाईल. आ.व. २०१५–१६साठी आरइन्फ्रा–डीने माननीय आयोगाने २०१४च्या प्रकरण क्र. १२३ मध्ये दिनांक १४ ऑगस्ट २०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार ४.०८% एवढा पारेषणातील तोटा विचारात घेतलेला आहे.

**तक्ता ५: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंतची शिल्लक ऊर्जा**

(मेयू)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| एकूण विक्री (चेंजओव्हर आणि ओए विक्रीसहित) | ९, ३३५. १३ | ९, ३२१. २५ | ९, ५९०. ९८ | ९, ९०७. ५८ |
| वितरणातील तोटा (%) | ९. ४९% | ९. ५०% | ९. ४१% | ९. ३६% |
| पारेषण आणि वितरण यांच्या सीमारेषेवरील ऊर्जा इनपूट | १०, ३१३. ३६ | १०, २९९. ४४ | १०, ५८७. २४ | १०, ९३०. ६९ |
| चेंजओव्हर आणि ओए ग्राहकांना बहाल करण्याजोगे इनपूट | ३, ३६७. २० | ३, ०८९. २१ | २, १६५. ७३ | २, ०९८. ३० |
| आरइन्फ्रा–डीच्या ग्राहकांना बहाल करण्याजोगे इनपूट | ६, ९४६. १५ | ७, २१०. २२ | ८, ४२१. ५१ | ८, ८३२. ३९ |
| पारेषणातील तोटा (%) | ५. १८% | ४. ०९% | ३. ९४% | ४. ०८% |
| निर्मिती आणि पारेषण यांच्या सीमारेषेवरील ऊर्जा इनपूट | ७, ३२५. ९५ | ७, ५१७. ५२ | ८, ७६७. २२ | ९, २०८. ०८ |

आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४मधील वितरणातील वास्तविक तोटा एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या तोट्यांपेक्षा अधिक आहे. आरइन्फ्रा–डीचे म्हणणे असे आहे की, आरइन्फ्रा–डीच्या वितरण प्रणालीत किरकोळ ग्राहकांचाही समावेश आहे, ज्यांना आरइन्फ्रा–डीकडून तसेच टीपीसी–डीकडूनही पुरवठा केला जातो. आरइन्फ्रा–डीच्या नेटवर्कवरील किरकोळ ग्राहकांना जवळजवळ एकतृतीयांश विक्री टीपीसी–डीकडून केली जाते. अशा प्रकारे, आरइन्फ्रा–डीकडे तेवढ्या प्रमाणातील ऊर्जेची मालकी नाही आणि म्हणून अशा प्रकारच्या ऊर्जेच्या पुरवठ्यात होणाऱ्या वाणिज्यिक तोट्यासाठी त्यांना जबाबदार धरता येणार नाही. आरइन्फ्रा–डी ही एकमेव वायर्स आणि पुरवठा कंपनी असती, तर प्रणालीतील सर्व तोट्यांसाठी आरइन्फ्रा–डीला जबाबदार धरता आले असते, मग तो तांत्रिक असो वा वाणिज्यिक. तथापि, जर दुसऱ्या कंपनीकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जेचा पुरवठा होत असेल, जी अशा पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्वत:चे मीटर्स वापरीत असेल, तर तोट्यातील बदलांची जबाबदारी फक्त आरइन्फ्रा–डीचीच असू शकत नाही.

## ४.३ विजेची खरेदी

आपल्या परवानाप्राप्त क्षेत्रात बेस लोडची गरज पूर्ण करण्यासाठी, आरइन्फ्रा–डी डहाणू औष्णिक ऊर्जा केंद्राकडून (आरइन्फ्रा–जी) आणि विदर्भ इंडस्ट्रिज पॉवर लिमिटेडकडून (व्हीआयपीएल) वीज प्राप्त करते. आरइन्फ्रा–डीने आरइन्फ्रा–जीबरोबर १० वर्षांचा वीज खरेदी करार (पीपीए) केलेला आहे, ज्याला माननीय आयोगाने मान्यता दिलेली आहे. शिवाय, आरइन्फ्रा–डीने व्हीआयपीएलबरोबर १ एप्रिल २०१४पासून ६०० मेवॅ विजेच्या पुरवठ्यासाठी दीर्घकालीन वीज खरेदी करार (पीपीए) केलेला आहे. त्यानुसार, व्हीआयपीएल आरइन्फ्रा–डीला दीर्घकालीन वीज खरेदी करारांतर्गत वीज पुरवीत आहे. शिवाय, आ.व. २०१२–१३मध्ये आणि आ.व. २०१३–१४मध्ये आरइन्फ्रा–डीने वर्धा पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (डब्ल्यूपीसीएल), अभिजीत एमएडीसी लिमिटेड आणि व्हीआयपीएल यांच्याकडून मध्यम मुदतीच्या वीज खरेदी करारांतर्गत वीज प्राप्त केलेली आहे. आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या तिमाहीत आरइन्फ्रा–जीला देय असलेल्या स्थिर आकरांसाठी आरइन्फ्रा–डीने माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेले (२०१३चे प्रकरण क्र. १) स्थिर आकार विचारात घेतलेले आहेत. आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीत आरइन्फ्रा–जीला देय असलेल्या बदलत्या आकारांसाठी आरइन्फ्रा–डीने माननीय आयोगाने दिनांक १३ जून २०१३ रोजीच्या एमवायटी आदेशात मान्यता दिलेले (२०१३चे प्रकरण क्र. १) बदलते आकार विचारात घेतलेले आहेत. आ.व. २०१५–१६मध्ये आरइन्फ्रा–जीला देय असलेल्या स्थिर आणि बदलत्या आकारांसाठी आरइन्फ्रा–डीने माननीय आयोगाने आरइन्फ्रा–जीने त्यांच्या मध्यावधी पुनरावलोकन याचिकेत वर्तविलेले अंदाज विचारात घेतलेले आहेत. व्हीआयपीएलला आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीत आणि आ.व. २०१५–१६मध्ये देय असलेल्या स्थिर खर्चांच्या बाबतीत, आरइन्फ्रा–डीने माननीय आयोगाने दिनांक १७ जानेवारी २०१४ रोजीच्या आदेशात मान्यता दिलेले स्थिर खर्च विचारात घेतलेले आहेत. व्हीआयपीएलला आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीत आणि आ.व. २०१५–१६मध्ये देय असलेल्या बदलत्या खर्चांच्या बाबतीत, आरइन्फ्रा–डीने व्हीआयपीएलकडून ऊर्जेची संभाव्य उपलब्धता आणि आ.व. २०१४–१५च्या उर्वरित कालावधीसाठी व त्यानंतर आ.व. २०१५–१६साठी बदलते आकार यांच्याबद्दल माहिती मागविलेली होती. व्हीआयपीएलने त्यांच्या दिनांक १० नोव्हेंबर २०१४च्या पत्रात नोव्हेंबर २०१४ पासूनची ऊर्जेची संभाव्य उपलब्धता आणि पुढील विजेची बदलती किंमत यांच्याविषयी माहिती कळविलेली आहे. म्हणून आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीचे व्हीआयपीएलच्या ऊर्जेच्या आकारांचा अंदाज लावण्यासाठी, आरइन्फ्रा–डीने ऑक्टोबर २०१४ या महिन्याची वास्तविक आकडेवारी आणि त्यानंतरचे व्हीआयपीएलने वर्तविलेले अंदाज विचारात घेतलेले आहेत.

आपल्या सौर नवीनीकरणयोग्य खरेदीची जबाबदारी (आरपीओ) पार पाडण्यासाठी आरइन्फ्रा–डी धुसर सोलर पॉवर प्रा. लि. यांच्याकडून माननीय आयोगाने ठरवून दिलेल्या सर्वसामान्य किमतीला सौर ऊर्जा खरेदी करते. आपल्या बिगर–सौर आरपीओची गरज भागविण्यासाठी आरइन्फ्रा–डी बिगर–सौर नवीनीकरण स्रोतांपासून वीज खरेदी करारातील दरांनुसार वीज खरेदी करते. बिगर–सार स्रोतांपासून खरेदी केलेली वीज विचारात घेतल्यानंतर, बिगर–सौर आरपीओमध्ये काही कमी पडत असल्यास, त्यासाठी नवीनीकरणयोग्य ऊर्जा प्रमाणपत्रांच्या (आरईसीज) द्वारे ती पूर्ण केली जाते. माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१३च्या एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) असा निकाल दिलेला आहे की, धुरसर सोलरकडून सौर आरपीओ लक्ष्यापेक्षा अधिक केलेल्या खरेदीला अल्पकालीन वीज खरेदीच्या मेरिट ऑर्डर स्टॅकमधील सर्वोच्च दरानुसार मान्यता दिली जाईल. तथापि, आरइन्फ्रा–डीने धुरसर सोलरबरोर ४० मेवॅच्या संपूर्ण क्षमतेसाठी करार केलेला आहे आणि म्हणून हा खर्च एआरआर याचिकेत हिशेबात घेतला पाहिजे. म्हणून आरइन्फ्रा–डीने धुरसर सोलरकडून खरेदी केलेल्या विजेचा काही हिस्सा सौर आरपीओकडे दर्शविलेला आहे आणि धुरसर सोलरकडून केलेली अतिरिक्त खरेदी सामान्य वीज खरेदी म्हणून दर्शविलेली आहे.

शिवाय, एमएसएलडीच्या निर्देशानुसार (दिनांक २६ मार्च २०१४) आरइन्फ्रा–डीने एप्रिल २०१४पासून पुढे टीपीसी युनिट ६ कडून वीज प्राप्त केलेली आहे. आरइन्फ्रा–डीने टीपीसी युनिट ६ कडून नोव्हेंबर २०१४पर्यंत वीज प्राप्त करण्यासाठी वास्तविक वीज खरेदी किंमत समाविष्ट केलेली आहे.

आपली सर्वाधिक भार असलेल्या कालावधीची गरज भागविण्यासाठी आणि भारातील बदलांचे व्यवस्थापन करण्यासाठी आरइन्फ्रा–डी अल्पकालीन स्रोतांकडून द्विपक्षीय करारान्वये आणि वीज विनियम(पॉवर एक्सचेंज)च्या माध्यमातून वीज प्राप्त करते. शिवाय, कमी मागणीच्या कालावधीतील अतिरिक्त वीज पॉवर एक्सचेंजच्या माध्यमातून विकली जाते. दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी असलेली स्टेट इंबॅलन्स पूलमधील ऊर्जेची वाढ आणि घट एमएसएलडीसीने जारी केलेल्या एफबीएसएम विवरणानुसार हिशेबात घेतलेली आहे. आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीत आणि आ.व. २०१५–१६मधील अल्पकालीन खरेदीच्या प्रमाणाचा आणि अतिरिक्त विक्रीच्या प्रमाणाचा अंदाज, आरइन्फ्रा–जी, व्हीआयपीएल आणि नवीनीकरणयोग्य स्रोतांपासूनची उपलब्धता विचारात घेऊन वर्तवलेला आहे. अल्पकालीन विजेच्या आवश्यकतेच्या किमतीचा आणि अतिरिक्त विजेच्या विक्रीपासूनच्या महसुलाचा अंदाज लावण्यासाठी आरइन्फ्रा–डीने प्रचलित द्विपक्षीय आणि एक्सचेंजचे दर विचारात घेतलेले आहेत.

आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीत आणि आ.व. २०१५–१६मध्ये देय असलेले पारेषण आकार, एसएलडीसी आकार आणि स्टँडबाय आकार माननीय आयोगाच्या संबंधित आदेशांनुसार विचारात घेतलेले आहेत. आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४मधील विविध स्रोतांकडूनची वास्तविक खरेदी आणि आ.व. २०१४–१५मधील आणि आ.व. २०१५–१६मधील अंदाजित खरेदी खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता ६: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंतची वीज प्राप्ती**

(मेयू)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| डीटीपीएस | ३, ९९४. ९५ | ३, ७३८. ८१ | ४, ०३२. ५१ | ३, ८०२. ८० |
| **मध्यम मुदतीचे वीज खरेदी करार** | | | | |
| डब्ल्यूपीसीएल | २, ०३९. ४९ | १, ४८९. ९९ | | |
| अभिजीत | ४४१. ९७ | ४२०. ९१ | | |
| व्हीआयपीएल | १, ००१. ०५ | ९९४. ८२ | | |
| व्हीआयपीएल – दीर्घकालीन वीज खरेदी करार | | | ३, ४४५. ६९ | ४, ०७०. ८३ |
| टीपीसी युनिट ६ | | | १८८. ४१ | |
| नवीनीकरणयोग्य | १९६. २२ | २८८. ८९ | २८५. ८५ | २८५. ८५ |
| अल्पकालीन खरेदी | ५०३. २४ | ८८३. ८२ | १, २७१. ०१ | १, ५२७. ५२ |
| अतिरिक्त विक्री | (८५०. ९७) | (२९९. ७२) | (४५६. २५) | (४७८. ९४) |
| **एकूण** | ७, ३२५. ९५ | ७, ५१७. ५२ | ८, ७६७. २२ | ९, २०८. ०८ |

आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४मधील वास्तविक वीज खरेदीची किंमत आणि आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६मधील वीज खरेदीची अंदाजित किंमत खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता ७: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंत वीज खरेदी किंमत**

(रु. कोटी.)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| डीटीपीएस | १, ३६१. ६६ | १, ३२५. ४१ | १, ४६४. ८७ | १, ६२६. ०२ |
| **मध्यम मुदतीचे वीज खरेदी करार** | | | | |
| डब्ल्यूपीसीएल | १, ०००. ३६ | ५०८. ६५ | ९५. ०० | |
| अभिजीत | २०४. २५ | १८०. ४१ | | |
| व्हीआयपीएल | ५१०. ०५ | ५०६. ७१ | | |

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| व्हीआयपीएल – दीर्घकालीन वीज खरेदी करार | | | २, ०४८. ०६ | १, ७९३. ३३ |
| टीपीसी युनिट ६ | | | २५२. १८ | |
| नवीनीकरणयोग्य | १६३. ४६ | २२७. ४१ | २३०. १२ | २३१. ९४ |
| आरईसीज[2] | ९०. ८१ | ६३. ६६ | ८०. ४० | ८६. १० |
| अल्पकालीन खरेदी | १९४. ९१ | २८९. २९ | ४८३. १३ | ६११. ०१ |
| अतिरिक्त विक्री | (१८३. ६९) | (७३. ४४) | (९९. ५०) | (१०६. ०२) |
| पारेषण आकार | २६१. ३७ | ४२८. १६ | ४३१. ०७ | ५०५. ५३ |
| एसएलडीसी आकार | १. ०५ | १. ६४ | २. ०४ | २. २४ |
| स्टँडबाय आकार | २२१. ०६ | ५९. ६४ | १३७. ०० | १४१. ४८ |
| **एकूण** | ३, ८२५. २९ | ३, ५१७. ५३ | ५, १२४. ३७ | ४, ८९१. ६३ |

## ४.४ एफएसीवर व्याज

माननीय आयोगाने दिनांक २२ ऑगस्ट २०१३च्या आरइन्फ्रा–डीच्या एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) एफएसीवरील (आ.व. २००८–०९ ते आ.व. २०१२–१३ या कालावधीसाठी) २.९६ कोटी रुपये व्याजाला आ.व. २०१३–१४च्या एआरआरमध्ये मान्यता दिलेली आहे. त्याव्यतिरिक्त, आरइन्फ्रा–डीने एप्रिल २०१३ ते जुलै २०१३ या महिन्यांसाठी एफएसी आकारलेले आहेत आणि त्यांचा समावेश आ.व. २०१३–१४च्या एआरआरमध्ये केला जाण्याची गरज आहे, ज्याची रक्कम ०.८४ कोटी रुपये आहे. म्हणून आ.व. २०१३–१४साठी एफएसीवरील व्याजाचा एकूण दावा आता ३.८१ कोटी रुपये एवढा सुधारित झालेला आहे. त्याचप्रमाणे, आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीत आकारलेले एफएसीवरील व्याज आ.व. २०१४–१५च्या एआरआरमध्ये समाविष्ट केलेले आहे, जे ३.१४ कोटी रुपये होते.

## ४.५ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या एमवायटी आदेशात आ.व. २०१२–१३ पासून ते आ.व. २०१५–१६ पर्यंतच्या प्रचालन आणि देखभाल खर्चाला मान्यता देताना, आ.व. २०१२–१३मधील दुरुस्ती आणि देखभाल खर्चातील सुधारित वेतनाचा २७.६३ कोटी रुपयांचा परिणाम वगळून, आ.व. २०१२–१३च्या वास्तविक खर्चांना मान्यता दिलेली होती. माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीला ह्या रकमेचा दावा करण्यासाठी पुढील दरपत्रक निश्चिती प्रक्रियेत योग्य ते समर्थन सादर करण्याचे आदेश दिलेले होते. आरइन्फ्रा–डीने आता तपशीलवार समर्थन (तपशीलवार याचिकेत

स्पष्ट केल्यानुसार) व त्यासोबत वेतन सुधारणा करार माननीय आयोगाच्या विचारार्थ सादर केलेला आहे. आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठी वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाचा दावा केलेला आहे. आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६च्या बाबतीत आरइन्फ्रा–डीने कर्मचाऱ्यांवरील खर्चाचा अंदाज ५ वर्षांच्या ग्राहक किंमत निर्देशांकातील पॉईंट टू पॉईंट तेजीचा उपयोग करून केलेला आहे. आरइन्फ्रा–डीने प्रशासकीय आणि सामान्य खर्चांचा अंदाज चढता घटक विचारात घेऊन, जो सीपीआयमधील ५ वर्षांच्या पॉईंट टू पॉईंट सरासरीच्या ६०% वेटमधून आणि डब्ल्यूपीआयमधील ५ वर्षांच्या पाईंट टू पॉईंट सरासरीच्या ४०% वेटमधून घेतलेला आहे.

शिवाय, माननीय आयोगाने आ.व. २०१२–१३च्या वास्तविक लेखापरीक्षित प्रचालन आणि देखभाल खर्चाला आरइन्फ्रा–डीने आपल्या दिनांक १५ जून २०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार विचारात घेतलेले आहेत आणि त्यानंतर प्रचालन आणि देखभाल खर्चाला मान्यता देण्यासाठी आरइन्फ्रा–टीला वाटप करण्याजोगे स्काडा आकार वजा केलेले आहेत. आरइन्फ्रा–डीचे असे म्हणणे आहे की, आ.व. २०१२–१३साठी केलेली वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाची केलेली तरतूद ही आरइन्फ्रा–टीला वाटप करण्यायोगे स्काडा आकार आणि आरइन्फ्रा–टीला जमिनीच्या वापरासाठी देय असलेले आकार यांमुळे समायोजनानंतरची होती. म्हणून आरइन्फ्रा–टीला वाटप करण्यायोगे स्काडा आकार दोनदा हिशेबात घेतले गेले होते. आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठीचे प्रचालन आणि देखभाल खर्च हे स्काडा आकार आणि जमीन वाटप आकार वजा जाता सादर केलेले आहेत. शिवाय, आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६च्या खर्चांचे अनुमान लावण्यासाठी आ.व. २०१३–१४साठीचे वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च सामान्य दराने वाढवून वर्तविण्यात आले आहेत.

प्रचालन आणि देखभाल खर्चातील मोठा हिस्सा रस्ते पुनर्बांधणी (आरआय) खर्चाचा आहे, जो बृहन्मुंबई महानगरपालिकेला, केबलच्या दुरुस्तीच्या कामासाठी किंवा केबलमधील दोष काढून टाकण्यासाठी खोदलेले खड्डे बुजविण्यासाठी दिला होता. बृमुंमनपाने रस्ते पुनर्बांधणीच्या दरांमध्ये सुधारणा केलेली आहे जी एप्रिल २०१४ पासून पुढील कालावधीसाठी लागू करण्यात आलेली आहे, ज्यायोगे हे दर ३०% पेक्षाही अधिक वाढविण्यात आलेले आहेत. म्हणून, दुरुस्ती आणि देखभाल खर्चांचा अंदाज लावण्यासाठी आरइन्फ्रा–डीने इतर दुरुस्ती आणि देखभाल खर्चांचा अंदाज (आरआय चार्जेसशिवाय) डब्ल्यूपीआयमधील गेल्या पाच वर्षांतील पॉईंट टू पॉईंट तेजीचा वापर करून लावलेला आहे. त्यानंतर, आ.व. २०१४–१५मध्ये आरइन्फ्रा–डीने बृमुंमनपाला देय असलेल्या रस्ते पुनर्बांधणी आकारांचा अंदाज सुधारित दरांनुसार वर्तविलेला आहे. आ.व. २०१४–१५साठीचे अनुमानित दुरुस्ती आणि देखभाल खर्च म्हणजे सुधारित दरांनुसार देय अंदाजित रस्ते दुरुस्ती आकार आणि आ.व. २०१४–१५साठीचे इतर दुरुस्ती आणि देखभाल खर्च यांची बेरीज आहे. आ.व. २०१४–१५मध्ये देय अंदाजित रस्ते पुनर्बांधणी आकार, आ.व. २०१५–१६मध्ये देय असलेल्या रस्ते पुनर्बांधणी आकरांचा अंदाज वर्तविण्यासाठी डब्ल्यूपीआयमधील ५ वर्षांच्या पाईंट टू पॉईंट सरासरीने वाढलेले आहेत.

आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४मधील वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च आणि आ.व. २०१४–१५मधील आणि आ.व. २०१५–१६मधील अंदाजित खर्च खालील तक्त्यात दर्शविलेले आहेत:

**तक्ता८: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६मधील प्रचालन आणि देखभाल खर्च**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| कर्मचाऱ्यांवरील खर्च | ५९२. ४९ | ५५४. ५० | ६१०. ०६ | ६७१. १९ |
| प्रशासकीय आणि सामान्य खर्च | १५३. ९३ | १६६. ९४ | १८०. ६९ | १९५. ५८ |
| दुरुस्ती आणि देखभाल खर्च | २२५. ०७ | २०३. ६६ | २३२. ५४ | २४५. ५२ |
| **एकूण** | ९७१. ५० | ९२५. ०९ | १, ०२३. २९ | १, ११२. २९ |

## ४.६ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

ज्या योजनांना माननीय आयोगाने तत्त्वत: मान्यता दिलेली आहे, त्यांच्या बाबतीतच आरइन्फ्रा–डी भांडवली खर्च करते. आ.व. २०१२–१३मध्ये आणि आ.व. २०१३–१४मध्ये माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या भांडवली खर्चाच्या तुलनेत हा खर्च कमी करण्यात आला होता, ज्याची कारणे तपशीलवार याचिकेत दिलेली आहेत. परिणामस्वरूपी, आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४मधील काही प्रकल्प आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६मध्ये पूर्ण होतील (स्पिलओव्हर). म्हणून आरइन्फ्रा–डीने आ.व. २०१४–१५मधील आणि आ.व. २०१५–१६मधील डीपीआर–निहाय भांडवली खर्चात आणि भांडवलीकरणात सुधारणा केलेली आहे. आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४मधील वास्तविक भांडवली खर्च आणि आ.व. २०१४–१५मधील आणि आ.व. २०१५–१६मधील अंदाजित भांडवली खर्च खालील तक्त्यात दाखविण्यात आलेले आहेत.

**तक्ता ९: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीचे भांडवली खर्च**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| भांडवली खर्च – वायर्स | १७४. ४० | २४२. ३४ | २५६. १९ | ३६९. ६० |
| भांडवली खर्च – रिटेल | ९. ३५ | १०. ५८ | ३६. ०० | ३५. ५२ |
| **एकूण** | १८३. ७६ | २५२. ९२ | २९२. १९ | ४०५. १२ |

आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४मधील भांडवलीकरण आणि आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६ मधील अंदाजित भांडवलीकरण खालील तक्त्यात दाखविलेले आहे:

**तक्ता१०: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६पर्यंत भांडवलीकरण**

**(रु. कोटी.)**

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| भांडवलीकरण – वायर्स | १९०. १२ | २९२. ८७ | २८६. ९५ | ३७३. ६० |
| भांडवलीकरण – रिटेल | ९. ३५ | १०. ५८ | ३६. ०० | ३५. ५२ |
| **एकूण** | १९९. ४७ | ३०३. ४५ | ३२२. ९५ | ४०९. १२ |

## ४.७ घसारा

मालमत्तेवरील घसारा एमवायटी नियमावली, २०११ अनुसार गणलेला आहे. वायर्स आणि रिटेल व्यवसायाचा घसारा खालील तक्त्यात दर्शविलेला आहे:

**तक्ता११: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीतील घसारा**

**(रु. कोटी.)**

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| घसारा – वायर्स | १५६. ७५ | १६७. ३८ | १८३. ०६ | १९१. ८७ |
| घसारा – रिटेल | २०. ८५ | १८. ६३ | १९. ५८ | २१. ४७ |
| **एकूण** | १७७. ६० | १८६. ०१ | २०२. ६४ | २१३. ३४ |

## ४.८ कर्जावरील व्याज

आ.व. २०११–१२मध्ये आरइन्फ्रा–डीने अपरिवर्तनीय रोख्यांच्या (एनसीडी) रूपाने १००० कोटी रुपयांचा निधी उभारला होता आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून ३५० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, ज्यासाठी आरइन्फ्रा–डीने कर्जवाटप होण्यापूर्वी निर्माण केलेल्या आणि भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेचे तारण दिले होते. आरइन्फ्रा–डीने हे अपरिवर्तनीय रोखे आणि कर्ज आ.व. २०१२–१३साठी व्याजाची गणना करताना विचारात घेतलेले होते. शिवाय, आ.व. २०१३–१४मध्ये आरइफ्रा–डीने अपरिवर्तनीय रोख्यांच्या रूपाने ५०० कोटी रुपये (आयडीबीआय बँकेकडून) आणि ६५० कोटी रुपये (ॲक्सिस बँकेकडून) विविध उद्देशांसाठी निधी उभारला होता. ६५० कोटी रुपयांचा संपूर्ण एनसीडी आरइन्फ्रा–डीच्या विविध व्यवसायांतील मालमत्तांवर परि–पासू चार्ज निर्माण करून सुरक्षित करण्यात आला होता. मुंबई वितरण व्यवसायाच्या विशिष्ट स्थिर मालमत्ताही या एनसीडीसाठी सेक्युरिटाइझ (तारण) करण्यात आलेल्या आहेत. मुंबईतील वितरण व्यवसायाच्या (आरइन्फ्रा–डी) मालमत्तेच्या सेक्युरिटाईझ केलेल्या बुक व्हॅल्यूच्या आधारे, आरइन्फ्रा–डीला बहाल करण्याजोगा एनसीडीचा हिस्सा २५० कोटी रुपये एवढा आहे. शिवाय, ५०० कोटी

रुपयांचे एनसीडी मुंबई वितरण व्यवसायाच्या मालमत्तेवर तसेच मुंबई व्यवसाय क्षेत्राबाहेर असलेल्या पवनचक्क्यांवर परि–पासू चार्ज निर्माण करून सेक्युअर करण्यात आलेले आहे. मुंबईतील वितरण व्यवसायाच्या (आरइन्फ्रा–डी) मालमत्तेच्या सेक्युरिटाईझ केलेल्या बुक व्हॅल्यूच्या आधारे, आरइन्फ्रा–डीला बहाल करण्याजोगा एनसीडीचा हिस्सा ४५० कोटी आरइन्फ्रा–डीने हे एनसीडी आ.व. २०१३–१४पासून पुढील व्याजावरील खर्चांची गणना करताना विचारात घेतलेले आहेत. व्याजाच्या दरांचा विचार करता, आरइन्फ्रा–डीने सर्व एनसीडीज वरील आणि वितरण व्यवसायांशी संबंधित कर्जांवरील वेटेड सरासरी व्याजदर विचारात घेतलेले आहेत, जे एमवायटी नियमावली, २०११ अनुसार आणि माननीय एटीईने २०१२च्या प्रकरण १३८ आणि १३९मध्ये दिलेल्या निकालानुसार आहेत. वायर्स आणि रिटेल व्यवसायासाठीच्या कर्जावरील व्याजाचा सारांश खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे:

**तक्ता१२: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठी कर्जावरील व्याज**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| कर्जांवरील व्याज – वायर्स | १३६. २९ | १३३. ७९ | १३७. ०९ | १५०. ०४ |
| कर्जांवरील व्याज – रिटेल | १५. २९ | १३. ६८ | १३. ५३ | १५. ०३ |
| **एकूण** | १५१. ५८ | १४७. ४७ | १५०. ६२ | १६५. ०८ |

## ४.९ इक्विटीवरील परतावा

इक्विटीवरील परताव्याची गणना एमवायटी नियमावली, २०११ अनुसार केलेली आहे. वायर्स आणि रिटेल व्यवसायासाठी इक्विटीवरील परताव्याचा सारांश खालील तक्त्यात दर्शविलेला आहे:

**तक्ता१३: आ.व. २०१२–१३ ते २०१५–१६ या कालावधीसाठी इक्विटीवरील परतावा**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| इक्विटीवरील परतावा – वायर्स | २२३. ५४ | २३३. ५६ | २४४. ३५ | २५९. ६८ |
| इक्विटीवरील परतावा – रिटेल | २७. ०६ | २६. ७५ | २७. ३७ | २९. ५४ |
| **एकूण** | २५०. ६० | २६०. ३१ | २७१. ७२ | २८९. २२ |

### ४.१० खेळत्या भांडवलावरील व्याज आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज

खेळत्या भांडवलावरील व्याज आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज आ.व. २०१२–१३ पासून ते आ.व. २०१५–१६ पर्यंत एमवायटी नियमावली, २०११ मधील विनियम ३५.३ आणि ३५.४ अनुसार गणलेले आहे.

### ४.११ बुडीत आणि संशयास्पद कर्जांसाठी तरतूद

वितरण व्यवसायासाठी बुडीत कर्जासाठीची वास्तविक तरतूद आ.व. २०१२–१३ साठी १२.१३ कोटी रुपये आणि आ.व. २०१३–१४साठी १४.४२ होती. तथापि, एमवायटी नियमावली, २०११ मध्ये बुडीत कर्जासाठीची तरतूद रिसिव्हेबल्सच्या १.५% असल्याने (वायर्स व्यवसाय आणि पुरवठा व्यवसायाला वाटप केलेले, लेखापरीक्षित हिशेबांमध्ये दर्शविलेले), आरइन्फ्रा–डीने बुडीत कर्जासाठीच्या तरतुदीची गणना त्यानुसार आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठी केलेली आहे. आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६साठी आरइन्फ्रा–डीने तात्पुरत्या बुडीत कर्जासाठी तरतुदीची रक्कम आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीतील वास्तविक तरतुदीवर आधारित अंदाजित केलेली आहे आणि ह्या रकमा संबंधित वर्षांच्या एआरआरमध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

### ४.१२ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी

आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ या कालावधीसाठीच्या आकस्मिकता राखीव निधीसाठीची वर्गणी एमवायटी नियमावली, २०११ च्या विनियम ३६.१ नुसार गणलेली आहे.

### ४.१३ आयकर

आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठी आरइन्फ्रा–डीने वितरण व्यवसायासाठी आयकराची गणना, माननीय एटीईने दिनांक १४ आणि १५ फेब्रुवारी २०११ रोजी दिलेल्या निकालात (२००९चे अपील क्र. १७३ आणि २००९चे अपील क्र. १७४) घालून दिलेल्या पद्धतीनुसार, स्टँड अलोन बेसिसवर केलेली आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले, तर आरइन्फ्रा–डीने करपूर्व नफ्याची व त्यावरील आयकराची गणना करण्यासाठी उत्पन्न वजा खर्च अशी पद्धत अवलंबिलेली आहे. या पद्धतीनुसार, आ.व. २०१२–१३मध्ये निव्वळ तोटा झालेला आहे आणि म्हणून आ.व. २०१२–१३साठी आयकराचा दावा केलेला नाही. आ.व. २०१२–१३साठीचा हा निव्वळ तोटा पुढे नेऊन आ.व. २०१३–१४च्या नफ्यात समायोजित केलेला आहे आणि त्यानंतर येणाऱ्या नफ्यावर लागू असलेल्या दराने आयकराची गणना केलेली आहे. आ.व. २०१३–१४साठीचा अशा प्रकारे गणना केलेला आयकर रिटेल व्यवसाय आणि वायर्स व्यवसाय यांच्यामध्ये वायर्स व्यवसाय आणि रिटेल व्यवसाय यांच्या महसुलाच्या आधारे विभागलेला आहे. आ.व. २०१४–१५साठी आणि आ.व. २०१५–१६साठी आरइन्फ्रा–डीने एमवायटी नियमावली, २०११ नुसार आ.व. २०१३–१४च्या पातळीतच विचारात घेतलेला आहे. नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी दावा केलेला आयकर खाली दर्शविलेला आहे:

**तक्ता१४: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठी आयकर**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| आयकर – वायर्स | – | २९. ३९ | २९. ३९ | २९. ३९ |
| आयकर – रिटेल | – | ८८. १४ | ८८. १४ | ८८. १४ |
| **एकूण** | – | ११७. ५२ | ११७. ५२ | ११७. ५२ |

## ४.१४ दराव्यतिरिक्तचे उत्पन्न

आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठीचे दराव्यतिरिक्तचे वास्तविक उत्पन्न आ.व. २०१२–१३च्या आणि आ.व. २०१३–१४च्या एआरआरज[2]मध्ये वजावटयोग्य घटक म्हणून विचारात घेतलेले आहेत. माननीय आयोगाने आपल्या दिनांक १५ जून २०१२ च्या आदेशात दिलेल्या निर्देशांनुसार (२०११ चे प्रकरण क्र. १८०) वीज खरेदीवरील सूट दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नात समाविष्ट केलेली आहे. याखेरीज, आकस्मिकता राखीव गुंतवणुकांवरील व्याजाची गणना वार्षिक हिशेबांनुसार आकस्मिकता राखीव गुंतवणुकांवरील सरासरी व्याजदर विचारात घेऊन केलेली आहे. माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१३च्या आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) आरइन्फ्रा–डीसाठीचे दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नाला आरइन्फ्रा–टीकडून जमिनीच्या वापरासाठी मिळणारे आकार आणि देवीदास लेन कार्यालयाच्या भाड्यापासूनचे उत्पन्न हे दराव्यतिरिक्तचे उत्पन्न आहे, असे समजून मान्यता दिलेली आहे. आरइन्फ्रा–टीकडून जमिनीच्या वापरासाठी मिळणारे आकार दराव्यतिरिक्तचे उत्पन्न म्हणून समजले जाऊ शकते, तर देवीदास लेन कार्यालयाच्या भाड्यापासूनचे उत्पन्न हे दराव्यतिरिक्तचे उत्पन्न म्हणून समजले जाऊ शकत नाही. आरइन्फ्रा–डीने ही बाब माननीय एटीईकडे (२०१३चे अपील क्र. २७४) उपस्थित केलेली आहे. आरइन्फ्रा–डीने आपल्या अपीलात जे म्हटलेले आहे, त्यास बाधा न आणता, त्यांनी जमिनीच्या वापरासाठीचे आकार आणि देवीदास लेन कार्यालयाचे भाडे दराव्यतिरिक्तचे उत्पन्न म्हणून विचारात घेतलेले आहे. आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठीचे दराव्यतिरिक्तचे वास्तविक उत्पन्न आ.व. २०१४–१५च्या आणि आ.व. २०१५–१६च्या दराव्यतिरिक्तच्या अंदाजित उत्पन्नासह खालील तक्त्यात दर्शविलेले आहे:

**तक्ता१५: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीचे दराव्यतिरिक्तचे उत्पन्न**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| दराव्यतिरिक्तचे उत्पन्न – वायर्स | ३४. ७७ | २१. ६७ | ४९. १० | ५२. ५६ |

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| दराव्यतिरिक्तचे उत्पन्न – रिटेल | १३७. ३५ | १५४. २९ | १३९. ११ | १४६. १३ |
| **एकूण** | १७२. १२ | १७५. ९६ | १८८. २१ | १९८. ६९ |

## ४.१५ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न

आरकॉमच्या बीटीएस टॉवर्सच्या संग्रहण केंद्रांच्या छताचा उपयोग आणि मीरा भायंदर क्षेत्रातील आणि खांबांवर लावलेल्या जाहिरातींपासून मिळणारे पैसे हे अन्य दोन व्यवसाय आहेत, ज्यांचा विचार आरइन्फ्रा–डीचे इतर व्यवसाय म्हणून केला जाऊ शकतो. आरइन्फ्रा–डीने या दोन्ही व्यवसायांपासून मिळणारे उत्पन्न कर वजा जाता लक्षात घेतलेले आहे आणि यातील एक तृतीयांश रक्कम एआरआरमधून वजावटयोग्य म्हणून विचारात घेतलेली होती. आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीतील इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहे:

**तक्ता१६: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीतील इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न**

(**रु. कोटी.**)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. १७ | ०. ४९ | ०. ४४ | ०. ४४ |

## ४.१६ आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठी कार्यक्षमता लाभ/तोटा

### ४.१६.१ वितरण तोट्यातील विचलन

याआधी या याचिकेत आरइन्फ्रा–डीने असे म्हटलेले आहे की, एकाच नेटवर्कला दोन रिटेलर्स वीजपुरवठा करीत असल्याने, आरइन्फ्रा–डीच फक्त मीटरिंग, विलंबित देयके, मीटरमधील दोष, चोऱ्या आणि चोरून वीज घेणे, इत्यादींशी संबंधित वाणिज्यिक तोट्यासाठी जबाबदार असू शकत नाही, विशेषत: इतर परवानाधारकांकडून वीज घेणाऱ्या बहुतेक ग्राहकांना अन्य परवानाधारकांचे मीटर वापरून वीज पुरविली जाते, आरइन्फ्रा–डीचे नाही. त्यानुसार, आरइन्फ्रा–डीने वितरणातील तोट्याशी संबंधित कार्यक्षमता लाभ/तोटा गणलेला नाही आणि आरइन्फ्रा–डी जाणते की असे करणे एमवायटी नियमावली,२०११ शी विसंगत होईल आणि त्यामुळे विनंती करीत आहे की माननीय आयोगाने त्यांच्या अडचणी दूर करण्याचा अधिकार (कलम १००) चा वापर करून वितरण तोट्यातील विचलनावरील दंड माफ करावा.

#### ४.१६.२ प्रचालन आणि देखभाल खर्चाचे (ओ अँड एम) विचलन

आ.व. २०१२–१३साठी प्रचालत आणि देखभाल खर्चातील संपूर्ण विचलन फक्त दुरुस्ती आणि देखभाल खर्चातील वेतनातील सुधारणांच्या थकबाकीमुळे आणि जमिनीच्या वापराच्या आकारांमुळे झालेले आहे. माननीय आयोगाने याच्या समर्थनार्थ फक्त वेतनातील सुधारणाच विचारात घेतल्या, त्याचे तपशील या याचिकेत तपशीलवार दिलेले आहेत, मात्र जमिनीच्या वापरावरील आकारातील विचलन, या याचिकेत याआधीच विनंती करूनही अजिबातच विचारात घेतले जाऊ शकले नाही. वरील म्हणण्यानुसार, आ.व. २०१२–१३मध्ये प्रचालन आणि देखभाल खर्चात कार्यक्षमता लाभ किंवा तोटा झालेला नाही. आ.व. २०१३–१४साठी माननीय आयोगाने आ.व. २०१२–१३चे कर्मचाऱ्यांवरील खर्च ६.१५% ने वाढवून आणि दुरुस्ती आणि आ.व. २०१२–१३साठी देखभाल खर्च ६.८३% ने वाढवून, प्रचालन आणि देखभाल खर्चांना मान्यता दिलेली आहे. प्रशासकीय आणि सामान्य खर्चांसाठी माननीय आयोगाने ६.१५% वर ६०% वेटेज लागू करून आणि ६.८३% वर ४०% वेटेज लागू करून गुणकाचा वापर केलेला आहे. तथापि, आ.व. २०१३–१४साठीचे वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च, माननीय आयोगाने वापरलेल्या वाढीच्या गुणकाच्या तुलनेत उच्च तेजीमुळे अधिक होते. आरइन्फ्रा–डीचे म्हणणे असे आहे की, आ.व. २०१३–१४साठीचे प्रचालन आणि देखभाल खर्च जरी आ.व. २०१२–१३साठी मान्यता दिलेल्या प्रचालन आणि देखभाल खर्चांपेक्षा अधिक असले, तरी जर आ.व. २०१२–१३साठीच्या प्रचालन आणि देखभाल खर्चांना सीपीआय आणि डब्ल्यूपीआयवर आधारित वाढीचे घटक लागू केले तर आ.व. २०१३–१४साठीचे प्रचालन आणि देखभाल खर्च परवानगीयोग्य मर्यादेच्या आत आहेत. तेजी हा नियंत्रणाबाहेरील घटक असल्याने आरइन्फ्रा–डीने प्रचालन आणि देखभाल खर्चाच्या बाबतीत कार्यक्षमता लाभ/तोटा गणलेला नाही.

### ४.१७ वायर्स आणि पुरवठा उपलब्धतेमुळे अतिरिक्त परतावा

एमवायटी नियमावली, २०११ अनुसार गणलेली आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठीची आरइन्फ्रा–डीने प्राप्त केलेली वायर्स उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धता खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता१७: आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४साठीची आरइन्फ्रा–डीने प्राप्त केलेली वायर्स उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धता**

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ |
|---|---|---|
| वायर्स उपलब्धता | ९९. ९८% | ९९. ९७% |
| पुरवठा उपलब्धता | १११% | १०९% |

एमवायटी नियमावली, २०११ अनुसार शहर आणि महानगर भागातील आरओईच्या पूर्ण वसुलीसाठी लक्ष्य वायर्स उपलब्धता ९५% आहे आणि आरओईच्या पूर्ण वसुलीसाठी लक्ष्य पुरवठा उपलब्धता ८५% ते ९५%च्या दरम्यान आहे. त्यानुसार, माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या दिनांक २३ नोव्हेंबर २०१२ च्या (२०११चे प्रकरण क्र. १५८) व्यवसाय योजना आदेशात, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी आरइन्फ्रा–डीच्या वायर्स उपलब्धतेच्या ९५% लक्ष्याला आणि पुरवठा उपलब्धतेच्या ९५% उपलब्धतेला मान्यता दिलेली आहे. तथापि, दिनांक २२

ऑगस्ट २०१३च्या एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) माननीय आयोगाने वायर्स उपलब्धतेसाठी ९९.९८%चे आणि पुरवठा उपलब्धतेसाठी १००% लक्ष्य निर्धारित केलेले आहे. आरइन्फ्रा–डीचे म्हणणे असे आहे की, १००%च्या आसपासची वायर्स उपलब्धता गाठण्यासाठी वितरण जाळ्याचे परिणामकारक प्रचालन आणि देखभाल तसेच दोष तात्काळ शोधून काढून दूर करणे आवश्यक असते. नेटवर्कच्या याच कार्यक्षम प्रचालनामुळे ग्राहकांना अहोरात्र वीजपुरवठा होऊ शकतो. त्याचप्रमाणे, अहोरात्र वीजपुरवठा होण्याची काळजी घेण्यासाठी आरइन्फ्रा–डीला विविध स्रोतांकडून पुरेशा प्रमाणात वीज घ्यावी लागली. म्हणून, एमवायटी नियमावली, २०११ मध्ये निर्धारित केलेल्या व व्यवसाय योजनेत मान्यता दिलेल्या लक्ष्य उपलब्धतेच्या तुलनेत आ.व. २०१२–१३मध्ये आणि आ.व. २०१३–१४मध्ये आवश्यकतेपेक्षा अधिक वायर्स उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धता प्राप्त केल्याबद्दल आरइन्फ्रा–डी अतिरिक्त परताव्यासाठी पात्र असायला हवी. त्यानुसार, आरइन्फ्रा–डीने वायर्स व्यवसायासाठी आणि रिटेल व्यवसायासाठी खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार अतिरिक्त परताव्याची गणना केलेली आहे:

**तक्ता१८: वायर्स उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धता अधिक प्रमाणात प्राप्त केल्याबद्दल अतिरिक्त परतावा**

(**रु. कोटी.**)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ |
|---|---|---|
| वायर्स व्यवसायासाठी अतिरिक्त परतावा | ७. १८ | ७. ४९ |
| रिटेल व्यवसायासाठी अतिरिक्त परतावा | २. ४९ | २. १३ |
| **एकूण** | ९. ६७ | ९. ६२ |

## ४.१८ टीपीसी–जीला प्रदान

माननीय आयोगाने दिनांक ५ जून २०१३ रोजी दिलेल्या आदेशात (२०११ चे प्रकरण क्र. १७७) आरइन्फ्रा–डीने टीपीसीला करावयाच्या प्रदानाची रक्कम १६५.६८ कोटी रुपये देण्यास मान्यता दिलेली आहे आणि आ.व. २०१३–१४च्या महसुलाच्या आवश्यकतेला मान्यता देताना, एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) तीच रक्कम विचारात घेतलेली आहे. आरइन्फ्रा–डी ने आ.व. २०१३–१४मध्ये दिनांक ५ जून २०१३च्या आदेशानुसार (२०११ चे प्रकरण क्र. १७७) प्रदान केलेले आहे. आ.व. २०१३–१४साठीच्या एकूण महसुलाच्या आवश्यकतेत हा खर्च समाविष्ट करण्यात आलेला आहे.

## ४.१९ एकूण महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश

वायर्स व्यवसायासाठीची आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठीची एकत्रित महसुलाची आवश्यकता खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता१९: वायर्स व्यवसायासाठीची आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६ या कालावधीसाठीची एकत्रित महसुलाची आवश्यकता**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** | **आ.व. २०१५–१६** |
|---|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** | **वर्तविण्यात आलेली** |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | ६६३. १५ | ६१७. ३८ | ६८६. ५९ | ७४३. ८१ |
| घसारा | १५६. ७५ | १६७. ३८ | १८३. ०६ | १९१. ८७ |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १३६. २९ | १३३. ७९ | १३७. ०९ | १५०. ०४ |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | ३५. ५८ | ३९. ९५ | ४५. ८६ | ४७. ५३ |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | १. ५५ | २. ३७ | २. ६५ | २. ६५ |
| इतर खर्च | – | – | – | – |
| आयकर | – | २९. ३९ | २९. ३९ | २९. ३९ |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | ९. ०९ | ९. ५३ | १०. २४ | १०. ९३ |
| **एकूण महसुली खर्च** | १, ००२. ४२ | ९९९. ७८ | १, ०९४. ८७ | १, १७६. २२ |
| समभाग भांडवलावरील परतावा | २२३. ५४ | २३३. ५६ | २४४. ३५ | २५९. ६८ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | १, २२५. ९६ | १, २३३. ३४ | १, ३३९. २२ | १, ४३५. ९० |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | ३४. ७७ | २१. ६७ | ४९. १० | ५२. ५६ |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. १७ | ०. ४९ | ०. ४४ | ०. ४४ |
| वायर्स उपलब्धतेमुळे अतिरिक्त परतावा | ७. १८ | ७. ४९ | – | – |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | १, १९८. १९ | १, २१८. ६८ | १, २८९. ६८ | १, ३८२. ९० |

रिटेल व्यवसायासाठी आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१३–१४साठी एकूण महसुलाची आवश्यकता खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता२०: रिटेल व्यवसायासाठी आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६साठी एकूण महसुलाची आवश्यकता**

(**रू. कोटी.**)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| वीज खरेदी खर्च | ३, ५६३. ९२ | ३, ०८९. ३७ | ४, ६९३. ३० | ४, ३८६. १० |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | ३०८. ३५ | ३०७. ७१ | ३३६. ७१ | ३६८. ४८ |
| घसारा | २०. ८५ | १८. ६३ | १९. ५८ | २१. ४७ |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १५. २९ | १३. ६८ | १३. ५३ | १५. ०३ |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | ४९. ४९ | ५४. ९४ | ५७. ९० | ७८. १९ |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ७. ७८ | १०. ०९ | ११. ३१ | ११. ३१ |
| इतर खर्च | – | – | – | – |
| आयकर | – | ८८. १४ | ८८. १४ | ८८. १४ |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | २६१. ३७ | ४२८. १६ | ४३१. ०७ | ५०५. ५३ |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | १. २७ | १. २४ | १. २४ | १. ३३ |
| **एकूण महसुली खर्च** | ४, २२८. ३२ | ४, ०११. ९५ | ५, ६५२. ७७ | ५, ४७५. ५७ |
| समभाग भांडवलावरील परतावा | २७. ०६ | २६. ७५ | २७. ३७ | २९. ५४ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | ४, २५५. ३८ | ४, ०३८. ७० | ५, ६८०. १३ | ५, ५०५. १२ |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १३७. ३५ | १५४. २९ | १३९. ११ | १४६. १३ |
| टीपीसी–जी आकार | – | १६५. ६८ | – | – |
| एफएसीवर व्याज | – | ३. ८१ | ३. १४ | – |
| उपलब्धतेच्या पुरवठ्यामुळे अतिरिक्त परतावा | २. ४९ | २. १३ | – | – |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | ४, १२०. ५२ | ४, ०५६. ०३ | ५, ५४४. १६ | ५, ३५८. ९९ |

रिटेल आणि वायर्स व्यवसायासाठी आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६साठी एकूण महसुलाची आवश्यकता खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता २१: रिटेल आणि वायर्स व्यवसायासाठी आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१५–१६साठी एकूण महसुलाची आवश्यकता**

(रु. कोटी.)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ | आ.व. २०१५–१६ |
|---|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित | वर्तविण्यात आलेली |
| वीज खरेदी खर्च | ३, ५६३. ९२ | ३, ०८९. ३७ | ४, ६९३. ३० | ४, ३८६. १० |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | ९७१. ५० | ९२५. ०९ | १, ०२३. २९ | १, ११२. २९ |
| घसारा | १७७. ६० | १८६. ०१ | २०२. ६४ | २१३. ३४ |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १५१. ५८ | १४७. ४७ | १५०. ६२ | १६५. ०८ |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | ८५. ०८ | ९४. ८९ | १०३. ७६ | १२५. ७२ |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ९. ३३ | १२. ४५ | १३. ९६ | १३. ९६ |
| इतर खर्च | – | – | – | – |
| आयकर | – | ११७. ५२ | ११७. ५२ | ११७. ५२ |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | २६१. ३७ | ४२८. १६ | ४३१. ०७ | ५०५. ५३ |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | १०. ३६ | १०. ७७ | ११. ४८ | १२. २६ |
| **एकूण महसुली खर्च** | ५, २३०. ७४ | ५, ०११. ७४ | ६, ७४७. ६४ | ६, ६५१. ८० |
| समभाग भांडवलावरील परतावा | २५०. ६० | २६०. ३१ | २७१. ७२ | २८९. २२ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | ५, ४८१. ३४ | ५, २७२. ०४ | ७, ०१९. ३६ | ६, ९४१. ०१ |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १७२. १२ | १७५. ९६ | १८८. २१ | १९८. ६९ |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. १७ | ०. ४९ | ०. ४४ | ०. ४४ |
| टीपीसी–जी आकार | – | १६५. ६८ | – | – |
| एफएसीवर व्याज | – | ३. ८१ | ३. १४ | – |
| वायर्स/पुरवठा उपलब्धतेमुळे अतिरिक्त परतावा | ९. ६७ | ९. ६२ | – | – |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | ५, ३१८. ७२ | ५, २७४. ७१ | ६, ८३३. ८४ | ६, ७४१. ८९ |

आ.व. २०१२–१३साठी वास्तविक एआरआर आणि आ.व. २०१२–१३साठी मान्यता दिलेली एआरआर, विचलनाच्या मुख्य कारणांसहित खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता २२: आ.व. २०१२–१३ साठी वास्तविक एआरआर आणि मान्यता दिलेली एआरआर यांची तुलना**

**(रु. कोटी.)**

| तपशील | वास्तविक | आदेश | फरक | विचलनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ३, ५६३. ९२ | ३, ५५९. ५७ | ४. ३५ | |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | ९७१. ५० | ९४२. ६३ | २८. ८७ | माननीय आयोगाने आ.व. २०१२–१३च्या दुरुस्ती आणि देखभाल खर्चात २७. ६३ कोटी रुपयांची रक्कम एमवायटी आदेशात समर्थनाच्या अभावामुळे राखून ठेवलेली आहे. |
| घसारा | १७७. ६० | १८२. ४१ | (४. ८१) | कमी भांडवलामुळे घसाऱ्यातील घट |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १५१. ५८ | १२७. ८९ | २३. ६९ | आरइन्फ्रा–डीने व्याजाची गणना करण्यासाठी वितरण व्यवसायाशी संबंधित वास्तविक कर्जे विचारात घेतलेली आहेत, तर माननीय आयोगाने एमवायटी आदेशात व्याजावरील खर्चांना मान्यता देताना आरइन्फ्रा–डीच्या एकूणच कर्जांचा विचार केलेला आहे. |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | ८५. ०८ | ९१. ८० | (६. ७२) | |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ९. ३३ | – | ९. ३३ | एमवायटी आदेशात बुडीत कर्जांसाठी कोणत्याही तरतुदीस परवानगी देण्यात आलेली नाही. |
| इतर खर्च | – | – | – | |
| आयकर | – | – | – | |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | २६१. ३७ | २६५. ३९ | (४. ०२) | |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | १०. ३६ | १०. ३६ | – | |
| **एकूण महसुली खर्च** | ५, २३०. ७४ | ५, १८०. ०५ | ५०. ६९ | |
| समभाग भांडवलावरील परतावा | २५०. ६० | २५४. ९९ | (४. ३९) | कमी भांडवलामुळे आरओईमधील घट |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | ५, ४८१. ३४ | ५, ४३५. ०४ | ४६. ३० | |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १७२. १२ | १८३. १७ | (११. ०५) | दराव्यतिरिक्तचे वास्तविक उत्पन्न कमी असल्यामुळे दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नात घट |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. १७ | ०. २५ | (०. ०८) | |
| वायर्स/पुरवठा उपलब्धतेमुळे अतिरिक्त परतावा | ९. ६७ | – | ९. ६७ | ट्रूईंग अपच्या वेळेस अतिरिक्त परतावे मान्य करण्याजोगे असल्यामुळे |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | ५, ३१८. ७२ | ५, २५१. ६२ | ६७. १० | |

आ.व. २०१३–१४साठीच्या वास्तविक एआरआरमध्ये आणि आ.व. २०१३–१४च्या मान्यता दिलेल्या घटकनिहाय विचलनामधील तुलना, त्यासोबत विचलनाची प्रमुख कारणे खालील तक्त्यात दर्शविलेली आहेत:

**तक्ता २३: आ.व. २०१३–१४ च्या वास्तविक एआरआर आणि मान्यता दिलेल्या एआरआरमधील तुलना**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **वास्तविक** | **आदेश** | **फरक** | **विचलनाचे कारण** |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ३, ०८९. ३७ | ३, २६२. ३७ | (१७३. ००) | वीज खरेदी खर्चातील घट मुख्यत: डब्ल्यूपीसीएलकडील वीज खरेदी किमतीत घट झाल्यामुळे |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | ९२५. ०९ | ९१३. १८ | ११. ९१ | उच्च तेजीमुळे प्रचालन आणि देखभाल खर्चात वाढ |
| घसारा | १८६. ०१ | १९९. ७० | (१३. ६९) | कमी भांडवलामुळे घसाऱ्यातील घट |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १४७. ४७ | १३३. ३८ | १४. ०९ | आरइन्फ्रा–डीने व्याजाची गणना करण्यासाठी वितरण व्यवसायाशी संबंधित वास्तविक कर्जे विचारात घेतलेली आहेत, तर माननीय आयोगाने एमवायटी आदेशात व्याजावरील खर्चांना मान्यता देताना आरइन्फ्रा–डीच्या एकूणच कर्जांचा विचार केलेला आहे. |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | ९४. ८९ | ९७. ५४ | (२. ६५) | |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | १२. ४५ | – | १२. ४५ | एमवायटी आदेशात बुडीत कर्जांसाठी कोणत्याही तरतुदीस परवानगी देण्यात आलेली नाही. |
| इतर खर्च | – | – | – | |
| आयकर | ११७. ५२ | – | ११७. ५२ | एमवायटी नियमावली, २०११ नुसार गणलेला वितरण व्यवसायाचा आयकर |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | ४२८. १६ | ४२८. ११ | ०. ०५ | |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | १०. ७७ | ११. २३ | (०. ४६) | |
| **एकूण महसुली खर्च** | ५, ०११. ७४ | ५, ०४५. ५१ | (३३. ७७) | |
| समभाग भांडवलावरील परतावा | २६०. ३१ | २७०. ४९ | (१०. १८) | कमी भांडवलामुळे आरओईमधील घट |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | ५, २७२. ०४ | ५, ३१६. ०० | (४३. ९६) | |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १७५. ९६ | १९५. ०० | (१९. ०४) | दराव्यतिरिक्तचे वास्तविक उत्पन्न कमी असल्यामुळे दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नात घट |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. ४९ | ०. २५ | ०. २४ | |
| टीपीसी–जी आकार | १६५. ६८ | १६५. ६८ | – | |
| एफएसीवर व्याज | ३. ८१ | २. ९६ | ०. ८५ | |

| तपशील | वास्तविक | आदेश | फरक | विचलनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| वायर्स/पुरवठा उपलब्धतेमुळे अतिरिक्त परतावा | ९. ६२ | – | ९. ६२ | ट्रूईंग अपच्या वेळेस अतिरिक्त परतावे मान्य करण्याजोगे असल्यामुळे |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | ५, २७४. ७१ | ५, २८९. ३९ | (१४. ६८) | |

आ.व. २०१४–१५ साठीच्या वास्तविक एआरआरमध्ये आणि आ.व. २०१४–१५ च्या मान्यता दिलेल्या घटकनिहाय विचलनामधील तुलना, त्यासोबत विचलनाची प्रमुख कारणे खालील तक्त्यात दर्शविलेली आहेत:

**तक्ता २४: आ.व. २०१४–१५ साठीच्या वास्तविक एआरआरमधील आणि मान्यता दिलेल्या एआरआरमधील तुलना**

(**रु. कोटी.**)

| तपशील | वास्तविक | आदेश | फरक | विचलनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ४, ६९३. ३० | ३, १९७. ६९ | १, ४९५. ६१ | वीज खरेदी खर्चात झालेली वाढ मुख्यत: व्हीआयपील खरेदी केलेल्या विजेच्या किमतीतील वाढ, टीपीसी युनिट ६कडून प्राप्त केलेली वीज, डब्ल्यूपीसीएलला केलेले प्रदान आणि रिव्हर्स मायग्रेशनमुळे अल्पकालीन खरेदी यांमुळे झालेली आहे. |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | १, ०२३. २९ | ९७१. १७ | ५२. १२ | प्रचालन आणि देखभाल खर्चातील वाढ ही वाढीचे उच्च घटक विचारात घेतल्याने आणि बृमुंमनपाने रस्ते पुनर्बांधणी आकारांमध्ये ३०% केलेल्या वाढीमुळे झालेली आहे. |
| घसारा | २०२. ६४ | २१९. १४ | (१६. ५०) | कमी भांडवलामुळे घसाऱ्यातील घट |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १५०. ६२ | १३८. ९१ | ११. ७१ | आरइन्फ्रा–डीने व्याजाची गणना करण्यासाठी वितरण व्यवसायाशी संबंधित वास्तविक कर्जे विचारात घेतलेली आहेत, तर माननीय आयोगाने एमवायटी आदेशात व्याजावरील खर्चांना मान्यता देताना आरइन्फ्रा–डीच्या एकूणच कर्जांचा विचार केलेला आहे. |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | १०३. ७६ | ९०. ९१ | १२. ८५ | |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | १३. ९६ | – | १३. ९६ | एमवायटी आदेशात बुडीत कर्जांसाठी कोणत्याही तरतुदीस परवानगी देण्यात आलेली नाही. |
| इतर खर्च | – | – | – | |
| आयकर | ११७. ५२ | – | ११७. ५२ | एमवायटी नियमावली, २०११ नुसार स्टँडअलोन बेसिसवर वितरण व्यवसायासाठी गणना केलेला आयकर |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | ४३१. ०७ | ३९०. २७ | ४०. ८० | |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | ११. ४८ | १२. १० | (०. ६२) | |
| **एकूण महसुली खर्च** | ६, ७४७. ६४ | ५, ०२०. | १, ७२७. ४५ | |

| तपशील | वास्तविक | आदेश | फरक | विचलनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| | | १९ | | |
| समभाग भांडवलावरील परतावा | २७१. ७२ | २८७. १९ | (१५. ४७) | कमी भांडवलामुळे आरओईमधील घट |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | ७, ०१९. ३६ | ५, ३०७. ३८ | १, ७११. ९८ | |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १८८. २१ | २०७. ६४ | (१९. ४३) | दराव्यतिरिक्तचे अंदाजित उत्पन्न कमी असल्याने दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नात घट |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. ४४ | ०. ४२ | ०. ०२ | |
| एफएसीवर व्याज | ३. १४ | – | ३. १४ | |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | ६, ८३३. ८४ | ५, ०९९. ३२ | १, ७३४. ५२ | |

आ.व. २०१५–१६साठीच्या अंदाज वर्तविलेल्या एआरआरमध्ये आणि आ.व. २०१५–१६च्या मान्यता दिलेल्या घटकनिहाय विचलनामधील तुलना, त्यासोबत विचलनाची प्रमुख कारणे खालील तक्त्यात दर्शविलेली आहेत:

**तक्ता २५: आ.व. २०१५–१६ साठी वास्तविक एआरआर आणि मान्यता दिलेल्या एआरआरमधील तुलना**

(**रु. कोटी.**)

| तपशील | वास्तविक | आदेश | फरक | विचलनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ४, ३८६. १० | ३, ३४९. ७७ | १, ०३६. ३३ | वीज खरेदी खर्चातील वाढ मुख्यत: डीटीपीएसचा उच्च स्थिर खर्चातील वाढ (माननीय आयोगाने २०१२च्या अपील क्र. १३८ आणि १३९मध्ये दिलेल्या निकालामुळे आणि मागील वर्षाच्या महसुलातील तफावतीमुळे), व्हीआयपीएलकडून खरेदीच्या खर्चातील वाढ आणि रिव्हर्स मायग्रेशनमुळे अल्पकालीन खरेदीतील वाढ यामुळे. |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | १, ११२. २९ | १, ०३२. ८६ | ७९. ४३ | प्रचालन आणि देखभाल खर्चातील वाढ ही वाढीचे उच्च घटक विचारात घेतल्याने आणि बृमुंमनपाने रस्ते पुनर्बांधणी आकारांमध्ये ३०% केलेल्या वाढीमुळे झालेली आहे. |
| घसारा | २१३. ३४ | २४०. ९९ | (२७. ६५) | कमी भांडवलामुळे घसाऱ्यातील घट |
| दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज | १६५. ०८ | १४६. ५९ | १८. ४९ | आरइन्फ्रा–डीने व्याजाची गणना करण्यासाठी वितरण व्यवसायाशी संबंधित वास्तविक कर्जे विचारात घेतलेली आहेत, तर माननीय आयोगाने एमवायटी आदेशात व्याजावरील खर्चांना मान्यता देताना आरइन्फ्रा–डीच्या एकूणच कर्जांचा विचार केलेला आहे. |
| खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहक सुरक्षा | १२५. ७२ | ८२. १२ | ४३. ६० | |

| तपशील | वास्तविक | आदेश | फरक | विचलनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| अनामतीवरील व्याज | | | | |
| बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | १३. ९६ | – | १३. ९६ | एमवायटी आदेशात बुडीत कर्जांसाठी कोणत्याही तरतुदीस परवानगी देण्यात आलेली नाही. |
| इतर खर्च | – | – | – | |
| आयकर | ११७. ५२ | – | ११७. ५२ | एमवायटी नियमावली, २०११ नुसार स्टँडअलोन बेसिसवर वितरण व्यवसायासाठी गणना केलेला आयकर |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | ५०५. ५३ | ४५३. २३ | ५२. ३० | |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी तरतूद | १२. २६ | १३. ११ | (०. ८५) | |
| **एकूण महसुली खर्च** | ६, ६५१. ८० | ५, ३१८. ६८ | १, ३३३. १३ | |
| समभाग भांडवलावरील परतावा | २८९. २२ | ३०६. ७८ | (१७. ५६) | कमी भांडवलामुळे आरओईमधील घट |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | ६, ९४१. ०१ | ५, ६२५. ४६ | १, ३१५. ५६ | |
| वजा: दराव्यतिरिक्तचे उत्पन्न | १९८. ६९ | २२४. ५२ | (२५. ८३) | अंदाज वर्तविलेले दराव्यतिरिक्तचे उत्पन्न कमी असल्याने दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नात घट |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०. ४४ | ०. ५६ | (०. १२) | |
| **निव्वळ एकूण महसुलाची आवश्यकता** | ६, ७४१. ८९ | ५, ४००. ३८ | १, ३४१. ५२ | |

## ४.२० विजेच्या विक्रीपासून महसूल

आ.व. २०१२–१३ आणि आ.व. २०१३–१४मधील विजेच्या विक्रीपासूनचा वास्तविक महसूल आणि आ.व. २०१४–१५ मधील अंदाजित महसूल (नियामक मालमत्तांवरील आकारापासूनचा महसूल वगळून) खालील तक्त्यात दाखविलेले आहेत:

**तक्ता २६: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ पर्यंतचा महसूल**

(**रु. कोटी.**)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ |
|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित |
| महसूल | ४, ४२१. ६९ | ४, ७४७. ५९ | ५, ७९९. ४१ |
| एमवायटी आदेशात मान्यता दिलेला | ४, ४४१. ६२ | ४, ६६३. ८५ | ४, १९१. ३२ |

माननीय आयोगाने आरइन्फ्रा–डीच्या एमवायटी आदेशात (२०१३चे प्रकरण क्र. ९) ४४४१.६२ कोटी रुपये एवढ्या विक्रीपासूच्या महसुलास आ.व. २०१२–१३मध्ये मान्यता दिलेली आहे, तसेच आरइन्फ्रा–डीने एमवायटी प्रोसिडिंगच्या दरम्यान आपले म्हणणे मांडताना, नजरचुकीने ही रक्कम विक्रीपासूनच्या महसुलातून वजा केली नव्हती. अशा प्रकारे, आरइन्फ्रा–डीचे एमवायटीविषयीचे म्हणणे व त्यावर दिला गेलेला आदेश यामध्ये वीजचोरीपासूनचा महसूल वस्तुत: दोनदा हिशेबात घेतला गेला – विक्रीतून मिळालेला महसूल आणि दराव्यतिरिक्तचे उत्पन्न अशा दोहोंमध्ये. आ.व. २०१३–१४मध्ये आणि आ.व. २०१४–१५मध्ये विजेच्या विक्रीपासूनचा महसूल माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या महसुलापेक्षा ग्राहकांच्या रिव्हर्स मायग्रेशनमुळे आणि एमवायटी नियमावली, २०११ अनुसार ग्राहकांना आकारलेल्या एफएसीमुळेही अधिक आहे.

## ४.२१ चेंजओव्हर आणि ओपन ॲक्सेस (ओए) ग्राहकांकडूनच्या व्हिलिंग चार्जेसपासून महसूल

आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४ मधील चेंजओव्हर आणि ओए ग्राहक यांच्याकडून व्हिलिंग चार्जेसमधून मिळालेला वास्तविक महसूल व त्यासोबत अशा ग्राहकांकडून आ.व. २०१४–१५मधील व्हिलिंग चार्जेसपासूनचा अंदाजित महसूल खालील तक्त्यात दर्शविलेले आहेत:

**तक्ता २७: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ या कालावधीतील व्हिलिंग चार्जेसपासूनचा महसूल**

(**रु. कोटी.**)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ |
|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित |
| व्हिलिंग चार्जेसपासूनचा महसूल | २५८. ७९ | २९६. १५ | २६५. ४१ |
| एमवायटी आदेशात मान्यता दिलेला | २५६. ०० | ३७७. ९० | ४२१. ३० |

आ.व. २०१२–१३मधील व्हिलिंग चार्जेसपासूनचा वास्तविक महसूल माननीय आयोगाने एमवायटी आदेशात आ.व. २०१२–१३साठी मान्यता दिलेल्या व्हिलिंग चार्जेसपासूनच्या महसुलापेक्षा थोडासा अधिक आहे. आ.व. २०१३–१४ाठी व्हिलिंग चार्जेसपासूनचा वास्तविक महसूल आ.व. २०१३–१४साठी एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या महसुलापेक्षा खालील कारणांमुळे बराच कमी आहे.

१. पहिले म्हणजे, माननीय आयोगाने टीपीसी–डीच्या दिनांक २८ जून २०१३च्या एमवायटी आदेशात (२०११ चे प्रकरण क्र. १७९) केलेल्या चेंजओव्हरचे अंदाज जास्तीचे होते.

२. दुसरे म्हणजे, माननीय आयोगाने व्हिलिंग चार्जेसची गणना आ.व. २०१३–१४च्या संपूर्ण कालावधीसाठी, चेंजओव्हर विक्रीवर आ.व. २०१३–१४च्या संपूर्ण कालावधीसाठी मान्यता दिलेले व्हिलिंग चार्जेस लागू करून केलेली आहे, पण वस्तुत: आ.व. २०१३–१४साठीचे मान्यता दिलेले व्हिलिंग चार्जेस सप्टेंबर २०१३पासून पुढे लागू झाले होते. आ.व. २०१३–१४च्या पहिल्या पाच महिन्यांमध्ये चेंजओव्हर ग्राहक जुने व्हिलिंग चार्जेस भरीत होते.

३. तिसरे म्हणजे, दिनांक २२ ऑगस्ट २०१३ रोजी आरइन्फ्रा–डीचा एमवायटी आदेश जारी झाल्यानतर, चेंजओव्हर ग्राहकांपैकी काही ग्राहक, आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या दरांमधील आणि चेंजओव्हर दरांमधील फरकाचा फायदा घेण्यासाठी पुन्हा टीपीसी–डीकडे वळलेले आहेत. आदर्श रीतीने विचार करायचा, तर चेंजओव्हर ग्राहकांच्या व्हिलिंग चार्जेसमध्ये, ग्राहक परत फिरल्यामुळे झालेली घट ही ग्राहक पुन्हा वळल्यानंतर स्वत:च्या किरकोळ दरांमधून वसुली करून त्याची भरपाई केली गेली पाहिजे. तथापि, तरीही अजून काही वसुली होणे बाकी राहीलच, कारण सध्याच्या पद्धतीनुसार, व्हिलिंग चार्जेस ढोबळ ऊर्जेवर (म्हणजेच मान्यता दिलेल्या व्हिलिंग तोट्यांसाठी ग्रॉस अप केलेली ऊर्जा) वसूल केले जातात, तर आरइन्फ्रा–डी किरकोळ दरांमधील व्हिलिंग चार्जेस फक्त मीटर्ड उर्जेवर वसूल केले जातात.

आ.व. २०१४–१५मध्ये व्हिलिंग चार्जेसपासूनचा अंदाजित महसूलही एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या आ.व. २०१४–१५च्या महसुलापेक्षा, वर दिलेल्या पहिल्या आणि तिसऱ्या कारणामुळे, बराच कमी आहे.

## ४.२२ क्रॉस सबसिडी चार्जेसपासूनचा (सीएसए) महसूल

आ.व. २०१२–१३मधील आणि आ.व. २०१३–१४मधील सीएसएपासूनचा वास्तविक महसूल आणि आ.व. २०१४–१५मध्ये सीएसएपासूनचा अंदाजित महसूल खालील तक्त्यात दर्शविलेले आहेत:

**तक्ता २८: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ या कालावधीसाठी सीएसएसपासूनचा महसूल**

(**रु. कोटी.**)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | आ.व. २०१३–१४ | आ.व. २०१४–१५ |
|---|---|---|---|
| | वास्तविक | वास्तविक | अंदाजित |
| सीएसएसपासूनचा महसूल | ९९. २० | २८८. ७४ | २२२. ०४ |
| एमवायटी आदेशात मान्यता दिलेला | ९८. ७० | ८१८. ८० | ८९५. ९० |

आ.व. २०१२–१३मधील सीएसएसपासूनचा वास्तविक महसूल हा एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या आ.व. २०१२–१३च्या सीएसएसपासूनच्या महसुलापेक्षा थोडासा जास्त आहे. पुढील कारणांमुळे आ.व २०१३–१४मधील सीएसएसपासूनचा वास्तविक महसूल हा एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या आ.व. २०१३–१४च्या सीएसएसपासूनच्या महसुलापेक्षा बराच कमी आहे:

१. पहिले म्हणजे, माननीय आयोगाने टीपीसी–डीच्या दिनांक २८ जून २०१३च्या एमवायटी आदेशात (२०११ चे प्रकरण क्र. १७९) केलेल्या चेंजओव्हरचे अंदाज जास्तीचे होते.

२. दुसरे म्हणजे, माननीय आयोगाने सीएएसपासूनच्या महसुलाची गणना आ.व. २०१३–१४च्या संपूर्ण कालावधीसाठी, चेंजओव्हर विक्रीवर आ.व. २०१३–१४च्या संपूर्ण कालावधीसाठी मान्यता दिलेले व्हिलिंग चार्जेस लागू करून केलेली आहे, पण वस्तुत:

आ.व. २०१३–१४साठीचे मान्यता दिलेले व्हिलिंग चार्जेस सप्टेंबर २०१३पासून पुढे लागू झाले होते. आ.व. २०१३–१४च्या पहिल्या पाच महिन्यांमध्ये चेंजओव्हर ग्राहक जुने व्हिलिंग चार्जेस भरीत होते.

३. तिसरे म्हणजे, दिनांक २२ ऑगस्ट २०१३ रोजी आरइन्फ्रा–डीचा एमवायटी आदेश जारी झाल्यानतर, चेंजओव्हर ग्राहकांपैकी काही ग्राहक, आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या दरांमधील आणि चेंजओव्हर दरांमधील फरकाचा फायदा घेण्यासाठी पुन्हा टीपीसी–डीकडे वळलेले आहेत.

४. चौथे कारण म्हणजे, माननीय आयोगाने आपल्या एमवायटी आदेशासाठी गणना करताना, ढोबळ चेंजओव्हर विक्रीवरील सीएसएस दर विचारात घेतले होते, मीटर्ड विक्रीवरील नव्हे; तर प्रत्यक्षात टीपीसी–डीने चेंजओव्हर ग्राहकांच्या मीटर्ड विक्रीवर सीएसएस लागू केलेले होते व त्यानुसार ते दिले गेले होते.

आ.व. २०१४–१५मध्ये सीएसएसपासूनचा अंदाजित महसूलही एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या आ.व. २०१४–१५च्या महसुलापेक्षा, वर दिलेल्या तिसऱ्या आणि चौथ्या कारणामुळे, बराच कमी आहे.

## ४.२३ आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ पर्यंतची महसुलातील तफावत

आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ पर्यंतची स्टँड अलोन महसुलातील तफावत खालील तक्त्यात दर्शविलेली आहे:

**तक्ता २९: आ.व. २०१२–१३ ते आ.व. २०१४–१५ पर्यंतची स्टँडअलोन महसुलातील तफावत**

(**रु. कोटी.**)

| **तपशील** | **आ.व. २०१२–१३** | **आ.व. २०१३–१४** | **आ.व. २०१४–१५** |
|---|---|---|---|
| | **वास्तविक** | **वास्तविक** | **अंदाजित** |
| **वायर्स आणि रिटेल व्यवसायासाठी एआरआर** | ५, ३१८. ७२ | ५, २७४. ७१ | ६, ८३३. ८४ |
